
सोमवार, २१ नोव्हेंबर २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १२४
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

उद्धव ठाकरेंच्या रक्तात हिंदुत्वाची विचारसरणी नाही-बावनकुळे/२
कर्नाळा अभयारण्य जागतिक पर्यटनस्थळाच्या दिशेने/३
आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेत रायगडचा दबदबा/८

## पीएम मोदींनी गुजरातमध्ये फोडला प्रचाराचा नारळ

**गुजरात** : गुजरात विधानसभेसाठी ५ डिसेंबरला दोन टप्प्यात मतदान होणार असून



मतमोजणी ८ डिसेंबरला होणार आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या प्रचाराचा नारळ रविवारी (दि. २०) फोडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सकाळी सर्वप्रथम सोमनाथ मंदिरात पूजा केली, त्यानंतर त्यांनी वेरावळ शहरात सभेला संबोधित केले. या वेळी पीएम मोदी म्हणाले की, गुजरातमध्ये आपल्याला विक्रम मोडायचा आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर भाजपला विजय मिळवायचा आहे. गुजरातबद्दल खूप काही बोलले गेले, गुजरात सरकारने या सर्व संकल्पना संपुष्टात आणल्या. गुजरातच्या प्रत्येक विकासात भाजपचा मोठा वाटा आहे. नागरिकांनी गुजरातची बदनामी करणाऱ्यांपासून सावध राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

# खारघरच्या निरसुख पॅलेसवर भाजपचा हल्लाबोल







## बार बंद होत नाही तोपर्यंत लढा सुरूच राहणार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

दारूमुक्त शहर अशी ओळख असलेल्या खारघरमधील नवीन परवानाधारक निरसुख पॅलेस बार व रेस्टॉरंटविरोधात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रविवारी (दि. २०) धरणे आंदोलन केले.

खारघरमधील नागरिक, राजकीय व सामाजिक संघटनांच्या एकत्रित चळवळीमुळे खारघरची ओळख दारूविक्री बंद खारघर अशी आहे. शैक्षणिक नगरी, पांडवकडा व खारघर हिलसारखे निसर्गरम्य परिसर व नो लिकर झोन यामुळे खारघरमध्ये राहणे अनेक नागरिक पसंत करतात. मागील २० वर्षांपासून नागरिकांच्या एकत्रित लढ्यामुळे खारघरमध्ये एकही वाईन शॉप किंवा बिअर शॉपी उघडले गेले नाही. काही वर्षांपूर्वी दोन-तीन व्यावसायिकांनी तसा प्रयत्न केला होता, परंतु संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांनी व राजकीय पक्षाने तो हाणून पाडला.

दोन आठवड्यांपूर्वी अशाच एका व्यावसायिकाने कोपरा गावातील सेक्टर १०मध्ये निरसुख बार व रेस्टॉरंट सुरू केले. महाविकास आघाडी सरकारच्या काळात या रेस्टॉरंटच्या मालकाला मद्यविक्री करण्याची परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे खारघरवासियांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली. भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपच्या शिष्टमंडळाने रविवारी धरणे आंदोलन केले. खारघर पोलीस ठाण्यात रितसर पत्र देण्यात आले होते. तत्पूर्वी आमदार प्रशांत ठाकूर, शहराध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे व उपाध्यक्ष बिना गोगरी यांनी याविरोधात संबंधित खात्यांशी पत्रव्यवहार केला होता.

रविवारी सकाळी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हॉटेल हायवे ब्रेक ते निरसुख बारपर्यंत चालत आंदोलन केले. सर्व कार्यकर्त्यांनी बारसमोर बसून धरणे दिले. हॉटेल मालकाविरोधात घोषणाबाजी करून हॉटेलवरील निरसुख बार व रेस्टॉरंट नावाचे फलक काढण्यात आले. स्थानिक आमदार प्रशांत ठाकूर यांनी, या आंदोलनात आम्ही जनतेसोबत होतो आणि शेवटपर्यंत राहू असे सांगितले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात या बारला परवाना मिळाल्याचेसुद्धा त्यांनी स्पष्ट केले. बारचा परवाना रद्द करण्याचा प्रयत्न शासन दरबारी करण्याचे प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी म्हंटले आहे.

या वेळी माजी सभापती अॅड. नरेश ठाकूर, माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, प्रवीण पाटील, हर्षदा उपाध्याय, आरती नवघरे, जिल्हा चिटणीस गीता चौधरी, जिल्हा सोशल मिडिया संयोजिका मोना अडवाणी, सरचिटणीस दीपक शिंदे,कीर्ती नवघरे, बिना गोगरी, गुरुनाथ गायकर, महिला सरचिटणीस साधना पवार, उपाध्यक्षा प्रतीक्षा कदम, युवा सरचिटणीस अमर उपाध्याय, अंकिता वारंग, अश्विनी भुवड, सीमा खडसे, सुशीला शर्मा, मीरा घुगे, वैशाली प्रजापती, ज्योत्स्ना पामकर, संतोष गायकर, काश्मीरा बेर्डे, निर्मला यादव, अश्विनी कदम, मीनाक्षी अंथवार, जल्पा शास्त्री, सुरेखा कदम, सुनिता देवाडिया, अजय माळी, राजेंद्र मांजरेकर, विनोद ठाकूर, केतन नवघरे, अनिल साबणे, विलास निकम, नवनीत मारू, नितीन पामकर, संतोष कदम, विलास सावंत, संदीप कासार, जयकुमार पांडे, शैलेंद्र त्रिपाठी, भूषण थोरात, सुखदेव खरात, बाळासाहेब काळे, तुकाराम घोडके,दिलीप पांचाळ, दिलीप नारळावकर, जे. एन. झा, संजय घरत, नाना घरत, विजय पाटील आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

### महापालिका व पोलिसांना विश्वासात घेतलेले नाही

*निरसुख बार व रेस्टॉरंटच्या मालकाने पनवेल महापालिका व स्थानिक पोलिसांना विश्वासात न घेता राज्य उत्पादन शुल्क खात्याकडून महाविकास आघाडी सरकारच्या काळात विशेष परवानगीने परवाना उपलब्ध झाल्याचे समोर आले आहे. खारघरची दारूविक्री बंद अशी ओळख मलिन होणार आहे. यामुळे खारघरवासियांमधून संताप व्यक्त होत आहे.*

उद्योगमंत्र्यांच्या आश्वासनानंतर

## ‘गेल’ प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन तूर्त स्थगित

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील उसर येथील गेल इंडिया लि. पेट्रोकेमिकल्स कंपनीतील स्थानिक प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी दिले. त्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतमजूर संघटनेच्या वतीने २१ नोव्हेंबर रोजी पुकारण्यात आलेले प्रकल्पग्रस्तांचे गेट बंद आंदोलन तुर्तास स्थगित करण्यात आले आहे.

भाजप जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य हक्कांसाठी राज्याचे उद्योगमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांना निवेदन दिले होते. याची दखल घेऊन पालकमंत्री उदय सामंत यांनी लवकरच गेल कंपनी व्यवस्थापनासह प्रकल्पग्रस्तांच्या बैठकीचे आयोजन केले जाईल, असे पत्र आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले आहे.

उसर येथील गेल कंपनीत शैक्षणिक पात्रतेनुसार कायमस्वरूपी नियुक्ती मिळावी, राज्य सुरक्षा दलाच्या भरतीमध्ये २५ टक्के स्थानिकांची भरती करावी, प्रकल्पातील अस्थायी भरती नियुक्ती संघटनेच्या समन्वयाने करावी अशा अनेक मागण्यांसह कंपनी व्यवस्थापनाकडून होणाऱ्या अन्यायाविरोधात उसर प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेने आंदोलनाची भूमिका घेतली होती. या आंदोलनाची रणनिती ठरविण्यासाठी नुकतीच प्रकल्पग्रस्त शेतमजूर संघटनेची बैठक झाली. त्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रकल्पग्रस्त संघटनेच्या वतीने गेल इंडिया कंपनीने मागण्या मान्य न केल्यास आंदोलनाशिवाय पर्याय नाही, असा इशारा दिला होता.

प्रकल्पग्रस्तांवर होणाऱ्या अन्यायाची ना. उदय सामंत यांनी दखल घेतली आहे. त्यांनी प्रकल्पग्रस्तांचे नेतृत्व करणारे आमदार प्रशांत ठाकूर यांना, गेल इंडिया लि. प्रकल्पासाठी अलिबाग तालुक्यातील नाईक कुणे, कंटक कुणे, धसाडे कुणे, उसर घोटवडे, मल्याण या सहा गावांतील २४७ शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्यासंबंधीचे निवेदन प्राप्त झाले आहे. यामध्ये प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य हक्कांसाठी आंदोलनाची भूमिका घेण्याचे ग्रामस्थांनी ठरवले आहे. या मागण्यांबाबत लवकरच सर्व संबंधित व गेल इंडियाचे प्रतिनिधी यांची आपल्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात येईल व प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्याची भूमिका घेण्यात येईल, असे पत्र दिले. त्यामुळे उसर प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळण्याची चिन्हे आहेत.

## निवडक

### वाघाच्या अवयवांची तस्करी

**नागपूर :** भंडारा वनविभागांतर्गत नाकाडोंगरी वनपरिक्षेत्रातील गोबरवाही येथे वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून वाघांची १५ नखे, तीन सुळे आणि दहा दात यांसह सुमारे पाच किलो हाडे आणि दुचाकी जप्त केली आहे. या वेळी दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. वाघांच्या अवयवांची तस्करी होत असल्याची गुप्त माहिती वनखात्याला मिळाली. यानंतर बनावट ग्राहक तयार करून गेल्या दोन दिवसांपासून वनाधिकाऱ्यांनी आरोपीसोबत चर्चा सुरू ठेवली. नागपूर व भंडारा वनविभागाने सापळा रचून आरोपी संजय पुस्तोडे व राम ऊईके यांना ताब्यात घेतले.

### अभिनेत्री एंड्रिला शर्माचे निधन

**कोलकता** : प्रसिद्ध बंगाली अभिनेत्री एंड्रिला शर्मा हिचे निधन झाले आहे. वयाच्या २४व्या वर्षी तिने अखेरचा श्वास घेतला. कोलकातामधील रुग्णालयात तिच्यावर उपचार सुरू होते. उपचारादरम्यान तिला मंगळवारी हृदयविकाराचे अनेक झटके आल्याने तिला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते.

## अलंकापुरीत कार्तिकीचा अनुपम्य सोहळा

### हजारो वारकऱ्यांनी घेतले माऊलींचे दर्शन

**पुणे : प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या संजीवन समाधी सोहळ्यांतर्गत अलंकापुरीमध्ये रविवारी (दि. २०) कार्तिकी यात्रेचा सोहळा साजरा झाला. त्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत. मंगळवारी (दि. २२) माऊलींचा संजीवन समाधी दिन सोहळा होणार आहे.



कोरोनाचे सावट दूर झाल्याने यंदा सोहळ्यासाठी मोठी गर्दी झाली आहे. इंद्रायणीत स्नान करून लाखो भाविकांनी ज्ञानदेवांच्या संजीवन समाधीचे डोळे भरून रविवारी दर्शन घेतले. इंद्रायणी घाट, हैबतबाबा पायरी, पुंडलिक मंदिर, नृसिह सरस्वती महाराज मंदिर, संत जलाराम मंदिर, राघवदास महाराज, ज्ञानेश्वर भिंत, साईबाबा मंदिर, गजानन महाराज मंदिर, पद्मावती मंदिर, गोपाळपुरा, विश्रांतवड आदी ठिकाणी भाविकांनी गर्दी केली आहे.

दरम्यान, दुपारी साडेबाराच्या महानैवद्यानंतर माऊलींच्या चांदीच्या मुखवट्याची सजावट व पोशाख परिधान करण्यात आला. दुपारी दीडच्या सुमारास माऊलींची पालखी नगरप्रदक्षिणेसाठी महाद्वारातून बाहेर पडली. शनीमंदिरापासून फुलवाले धर्मशाळा, चाकण चौक, भैराबा चौकमार्गे निघालेला हा सोहळा हजेरी मारुतीजवळ येऊन काही वेळापुरता विसावला.

### आळंदी विकासासाठी २५ कोटी - मंत्री पाटील

आळंदी विकासासाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटींचा निधी देण्याची ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. पाटील यांनी आळंदी मंदिरास भेट दिली. पाटील म्हणाले, की सुमारे ४०० एकरवरील जागेवर देवस्थानने विविध विकास कामांसाठी आराखडा केला आहे. या कामांसाठी निधी दिला जाईल.

## लष्कराला मिळणार ६२ हजार ५०० बुलेटप्रुफ जॅकेट्स

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दहशतवाद्यांकडून स्टील कोअर बुलेट वापरण्यात येत आहेत. त्यामुळे आता अत्याधुनिक जॅकेटसाठी भारतीय लष्कराने तातडीची निविदा काढली आहे. त्यामुळे सुमारे ६२ हजार ५०० बुलेटप्रुफ जॅकेट लष्कराला मिळणार आहेत.

'मेक इन इंडिया' अंतर्गत संरक्षण मंत्रालयाने जॅकेटसाठी दोन स्वतंत्र टेंडर काढले आहेत. यामध्ये ४७ हजार ६२७ जॅकेटसाठी जनरल निविदा तर १५ हजार जॅकेटसाठी आणीबाणीच्या खरेदी प्रक्रियेंतर्गत निविदा काढली आहे. याबाबतची माहिती सैन्यातील अधिकाऱ्यांनी एएनआयला दिली. काश्मीर खोऱ्यात दहशतवादी आणि भारतीय सुरक्षा दल यांच्या झालेल्या चकमकीमध्ये जॅकेट छेदणाऱ्या गोळ्यांचा वापर झाला आहे. त्यामुळे लष्कराने



तातडीने स्टील कोअर बुलेटप्रुफ जॅकेटसाठी टेंडर काढले आहे.

यामध्ये बीपीजी ७.६२ मिमी आर्मर पीअरिंग रायफल आणि १० मीटर अंतरावरुन गोळीबार केल्यास स्टील कोअर बुलेटपासून सैनिकांचे रक्षण होणार आहे. केवळ भारतात बनवल्या जाणाऱ्या जॅकेटचीच लष्कर खरेदी करणार आहे.

## आरोपी आफताबची आज नार्को टेस्ट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वसईच्या श्रद्धा वालकर हत्याप्रकरणी दिल्ली पोलीस श्रद्धाच्या मृतदेहाचे तुकडे शोधत आहेत. सहा महिन्यांपूर्वीच हत्या केल्याने आफताबने सर्व पुरावे नष्ट केले आहेत. त्यामुळे गुन्हा सिद्ध करण्याचे दिल्ली पोलिसांसमोर आव्हान आहे. सोमवारी (दि. २१) आफताबची नार्को टेस्ट होणार असून त्यासाठी दिल्ली पोलिसांनी ४० प्रश्नांची यादी तयार केली आहे.

श्रद्धाचा प्रियकर आफताब पुनावाला याने तिचे ३५ तुकडे केले होते. ते फ्रीजमध्ये ठेवून तो १८ दिवस हे तुकडे दिल्लीच्या जंगलात नेऊन टाकत होता. श्रद्धाचे शीर आफताबने छतरपुर एनक्लेव येथील तलावात टाकले होते. दिल्ली पोलीस आणि महापालिकेची टीम रविवारी (दि. २०) दिवसभर हे तलाव उपसत आहेत.





**माउंटमनुगेई : न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात भारताच्या सूर्यकुमार यादवने तुफानी शतक केले. त्याच्या या वर्षी आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये ११०० धावा पूर्ण झाल्या आहेत.**

## शेअर ट्रेडिंगमार्फत कोट्यवधींची फसवणूक

**मुंबई : प्रतिनिधी**

वृद्ध महिलेची ३.१४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी ४४ वर्षीय शेअर ट्रेडिंग एजंटला बोरिवली पोलिसांनी दिल्लीतून अटक केली. या प्रकरणात आरोपीने तक्रारदार महिला सेलिनो पिंटोची फसवणूक करीत पैसे बनावट डिमॅट खात्यात वळते केल्याचा आरोप आहे. आरोपी नरेश भरत सिंग याने बोरिवली पोलिसांकडे तशी गुन्ह्याची कबुली दिली आहे. कोरोना काळात नोकरी गमावल्यानंतर उदरनिर्वाहासाठी हे कृत्य केल्याचे त्याने सांगितले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ७७ वर्षीय महिला सेलिनो पिंटो ज्येष्ठ नागरिक असून त्या बोरिवली पश्चिम येथील शिंपोली भागात राहतात. त्यांच्याकडे १६ वेगवेगळ्या कंपन्यांचे ३.१४ कोटी रुपयांचे शेअर्स आहेत. अकाऊंटमधील नाव आणि पत्त्यातील बदलाबाबत शेअर ट्रेडिंग कंपनीने पिंटो यांना फसवणुकीबद्दल अलर्ट देत सावधान केले. त्यानंतर त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. आरोपीने महिलेच्या नावाने बनावट आधार कार्डही बनवले होते.

# पारा घसरल्याने ग्रामीण भागात शेकोट्या पेटू लागल्या



**माणगाव : प्रतिनिधी**

पावसाळा संपता संपता वेध लागतात ते हिवाळ्याचे आणि गुलाबी थंडीचे. हिवाळ्याच्या दिवसात सकाळी सकाळी पडणारे दाढ धुके आणि बोचणारी थंडी सर्वांना हवीहवीशी वाटते. या थंडीबरोबरच उबदार कपडे आणि चौकातून, घराबाहेर, घरांच्या कोपऱ्यांवर ऊब देण्यासाठी केलेल्या शेकोट्या आणि त्यांच्या भोवती गोलाकार बसून शेकोटीचा आनंद घेणारे नागरिक गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र दिसू लागले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून गारवा वाढत असल्याने अनेक ठिकाणी शेकोट्या दिसू लागल्या आहेत. अडगळीतील लाकडे, पालापाचोळा इत्यादींचा वापर करून या शेकोट्या केल्या जातात. अनेक ठिकाणी हिवाळ्यासाठी खास मोठे लाकूड, ओंडके शेकोटीकरिता ठेवले जाते. दररोज ते पेटवून शेकोटी केली जाते. लहान मुले, स्त्री-पुरुष, वृद्ध, तरुण सर्वजण या शेकोट्यांचा आनंद घेतात. सार्वजनिक ठिकाणी, चौकात तर आवर्जून शेकोट्या केल्या जातात. सकाळी अगदी सूर्याची किरणे जाणवेपर्यंत शेकोटीचा आनंद घेतला जातो.

हिवाळा आणि शेकोटीचा हा कार्यक्रम सर्वांच्या जीवनातील आनंदाचा भाग असून गाणी, गप्पा, विनोद आणि मनोरंजनाची वेगळी अशी पर्वणी यानिमित्ताने सर्वांना मिळते आहे.

ठराविक गावाचे नाव घेऊन त्या गावचा म्हातारा शेकोटीला आला असे गीत हमखास या शेकोटीमधून ऐकायला मिळते.

### महाबळेश्वर, पाचगणीत वाढला थंडीचा कडाका

**वाई : प्रतिनिधी**

राज्याचे मिनी काश्मीर म्हणून प्रसिद्ध असलेल्या महाबळेश्वर आणि पाचगणी येथे तापमानाचा पारा घसरला आहे.

रविवारी सकाळी वेण्णालेक परिसरात तापमान घसरले आहे. मागील काही दिवसांपासून महाबळेश्वर पाचगणीत दिवसरात्र थंडीचा अनुभव येत आहे. सध्या महाबळेश्वरमध्ये पर्यटकांची शनिवार व रविवार सुटी असल्याने पर्यटकांची रेलचेल पाहायला मिळत होती.

सकाळी थंडीचा कडाका, दिवसभर निसर्गाचा आनंद व रात्री उशिरापर्यंत मार्केटमध्ये खरेदी-विक्री करण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने महाबळेश्वरमध्ये दाखल होत आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात पाचगणी फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले असून पर्यटक या फेस्टिव्हलची माहिती घेत आहेत.

# उद्धव ठाकरेंच्या रक्तात हिंदुत्वाची विचारसरणी नाही

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

हिंदुत्वाची विचारसरणी उद्धव ठाकरे यांच्या रक्तात नाही, अशी टीका भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी (दि. २०) केली आहे.

हिंदुत्वाची विचारसरणी उद्धव ठाकरे यांच्या रक्तात नाही. आता उद्धव ठाकरे हे कोणत्याही विचारांसोबत जाऊ शकतात. राष्ट्रवादीचे नेते जे सांगतात तेच ते बोलतात. काँग्रेस जे लिहून पाठवते तेच 'सामना'मधून छापून येते. हिंदुत्वाचा विचार, बाळासाहेबांचा जाज्वल्य इतिहास आता उद्धव ठाकरेंकडे राहिला नाही. त्यामुळे ते कुणाशीही युती करू शकतात.



बावनकुळे म्हणाले की, हिंदुत्वाची विचारसरणी उद्धव ठाकरेंच्या रक्तातच नाही. आता उद्धव ठाकरे कोणासोबतही युती करू शकतात, तसेच उद्धव ठाकरेंनी स्वतःचा मूळ विचार सोडून आज काँग्रेस आणि एनसीपीचा विचार स्वीकारला आहे. त्यामुळे काँग्रेस आणि एनसीपी जेवढे सांगते तेवढेच ते बोलतात.

त्याचंबरोबर सामनाच्या अग्रलेखातून करण्यात आलेल्या टीकेबद्दल बोलताना काँग्रेस, एनसीपीची स्क्रिप्ट सामनात छापली जाते, अशी टीका चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली आहे, तसेच स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार पुढे घेऊन जाण्याएवढे कर्तृत्त्व आज उद्धव ठाकरे यांच्या रक्तात राहिलेले नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्याकडून कोणतीही अपेक्षा करता येणार नाही.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन सगळ्यांना प्रेरणादायी

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला विश्वास

**मुंबई : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाच्या उद्धारासाठी, कल्याणासाठी आयुष्यभर काम केले. त्यांच्या नावाने २७ कोटी रुपये खर्च करून मीरा भाईंदरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन उभे राहत आहे ही अत्यंत आनंद देणारी गोष्ट आहे. सर्व सुविधांनी सज्ज असे हे भवन येणाऱ्या पिढीला प्रेरणा देईल. याठिकाणी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राबरोबरच बँकिंग बाबतचे व स्वयंरोजगाराचेही प्रशिक्षण दिले जावे, असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी मीरारोड येथे केले.




आमदार प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून व प्रयत्नांनी साकार होत असलेल्या मीरा भाईंदरमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाचे भूमिपूजन रविवारी (दि. २०) रामदास आठवले यांच्या हस्ते झाले. ६० ते ६५ कोटी रुपये बाजार मूल्य असलेल्या हटकेश परिसरातील एक एकर मोक्याच्या जागेवर हे भवन होणार असून तीन मजली सांस्कृतिक भवनमध्ये विपश्यना हॉल, प्रदर्शन हॉल, ग्रंथालय, मिनी थिएटर, कॉन्फरन्स रूम, कॅफेएरिया, लिफ्ट अशा सर्व सुविधा असतील. राज्यातील आंबेडकरी चळवळीतील नेते-कार्यकर्ते जर मीरा भाईंदर शहरात आले, तर त्यांच्या विश्रामाची व्यवस्थाही भवनात केली जाईल. याच सांस्कृतिक भवनात स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळण्यासाठी केंद्रही सुरू केले जाणार आहे.

या वेळी व्यासपीठावर मनपा आयुक्त दिलीप ढोले, आमदार गीता जैन, रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष देवेंद्र शेलेकर, माजी महापौर ज्योत्स्ना हसनाळे, निर्मला सावळे, नीला सोंस, रिपाइं मुंबई युवक अध्यक्ष रमेश गायकवाड, चंद्रमानी मनवर, अनंत शिर्के, पालिका अधिकारी उपस्थित होते. गायक नंदेश उमप यांच्या भीमगीतांचा कार्यक्रम या वेळी झाला.

# खंडाळा घाटात खासगी बस पलटी

## १८ प्रवासी जखमी



**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर खंडाळा घाटात टाटा पॉवर वसाहतीजवळ अवघड वळणावर मुंबईला जाणाऱ्या खासगी बसचे ब्रेक निकामी झाल्याने बस रस्त्याच्या कडेला पलटी झाली. या बसमधील चालकासह १८ प्रवासी जखमी झाले आहेत. हा अपघात रविवारी (दि. २०) दुपारी २.४५ वाजण्याच्या दरम्यान झाला

चेंबूर मुंबई येथील जवाहर विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी एकविरा दर्शन घेण्यासाठी लोणावळा येथे आले होते. रविवारी दुपारी २.४५ वाजण्याच्या दरम्यान ते परतीच्या प्रवासाला निघाले. साडेतीनच्या दरम्यान खंडाळा घाटात टाटा पॉवरजवळ बसचे ब्रेक निकामी झाले. चालकाने प्रसंगावधान राखून बस रस्त्याच्या कडेला नेली, मात्र बस पलटी झाली. यातील जखमींना खोपोली नगर परिषद डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यापैकी डोक्याला गंभीर दुखापतीमुळे राजू हिप्परकर तसेच छातीला मुका मार लागल्याने कोंडीबा कुंडलकर यांना कामोठे येथे एमजीएम रुग्णालयात हलवण्यात आले आहे, तर काही जखमींना प्रथमोपचार करून पनवेलमध्ये हलविण्यात आल्याचे सांगण्यात आले.



**खोपोली : मुंबई- पुणे जुन्या महामार्गावर खंडाळा घाटात अंडा पॉईंटजवळ एसटीचे ब्रेक रिकामी झाल्याने चालकाने प्रसंगावधान राखून बस रस्त्याच्या कडेला सुखरूप नेल्याने गंभीर अपघात टळला. या अपघातात सहा ते सात प्रवाशांना किरकोळ जखमा झाल्या. ही बस आळंदीहून पेणकडे जात होती.**

# म्हसळा पोलिसांकडून विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांचे धडे



**म्हसळा : प्रतिनिधी**

सायबर सुरक्षा व सायबर गुन्हे याबाबत म्हसळा पोलिसांनी जनजागृती अभियान सुरू केले असून त्याचाच एक भाग म्हणून न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना धडे दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्षपदी प्राचार्य पी. एल. हाके होते. प्रस्तावना एन. एस. गायकवाड यांनी केली. एपीआय संदीपान सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मोबाइलचे व्यसन लागत असून त्याचे दुष्परिणाम अनेक कुटुंबासमोर येत असतात. अनेकदा हॅकर्स आपल्या बँक खात्याची माहिती मिळवतात व खाते रिकामे करतात, यालाच सायबर गुन्हे म्हणतात. आपल्या तालुक्यात असेही गुन्हे घडले आहेत. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने मोबाईलचा वापर केवळ अभ्यासासाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले.

इंटरनेटच्या व्यसनामुळे विद्यार्थी पूर्ण क्षमतेने, एकाग्रतेने अभ्यास करू शकत नाही. त्याचा परिणाम त्यांच्या निकालावर होत असतो एका आभ्यासात ४० टक्के विद्यार्थी इंटरनेटचा वापर सोशल मीडियासाठी करीत असून केवळ ३० टक्के विद्यार्थी शिक्षणासाठी माहिती मिळवण्यासाठी इंटरनेटचा वापर करीत आहेत, हे थांबणे गरजेचे असल्याचे मत प्राचार्य पी. एल. हाके यांनी व्यक्त केले. भविष्यात १२ ते १८ वयोगटांतील किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी संवाद बैठका आयोजित करायचा मानस असल्याचे या वेळी व्यक्त करण्यात आला.

# राज्यभरातील शाळा सॅटेलाइटने जोडणार -मंत्री केसरकर

**भिवंडी : प्रतिनिधी**

कोरोना काळात आदिवासी आणि दुर्गम भागात ऑनलाइन शिक्षण देताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. सरकारतर्फे राज्यभरातील सर्व शाळा सॅटेलाइटने जोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे भविष्यात दुर्गम भागातील ऑनलाईन शिक्षण पद्धतीतील अडचणी दूर करण्यात येणार आहेत. राज्यभरात डिजिटल शाळा सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, अशी माहिती राज्याचे शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

राज्यातील माझी ई-शाळा या डिजिटल साक्षर मिशन अभियानाची सुरुवात भिवंडीतून करण्यात आली. भिवंडीतील काल्हेर जिल्हा परिषद शाळेत या अभियानाचे उद्घाटन केसरकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रथम इन्फोटेक फाउंडेशन, जिल्हा परिषद ठाणे व राज्य सरकारच्या समग्र शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे, ठाणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुभाष पवार यांच्यासह एल अँड टी, प्रथम फाउंडेशनचे अधिकारी तसेच शिक्षण विभागाचे अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

केसरकर म्हणाले की, स्किल डेव्हलपमेंट महत्त्वाचे असून शाळा सॅटेलाइटने जोडण्यात येणार आहेत. शिक्षकांनी फळ्यावर लिहिलेली अक्षरे विद्यार्थ्यांच्या मोबाइल पवर संग्रहित होणार आहेत. तशी टेक्नॉलॉजीही लवकरच राज्यात विकसित करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात 'मातृभाषेतून शिक्षण' ही नवीन शिक्षण पद्धती अंमलात आणली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण घेणे शक्य होणार आहे. त्याचा इंजिनिअरिंग व मेडिकलच्या अभ्यासक्रमातही फायदा होणार आहे, तसेच इंग्रजी भाषेचा आपल्यावर असलेला पगडाही हळूहळू कमी होणार आहे. अनेक देशांत स्थानिक मातृभाषेतून शिक्षण घेत असल्याने ते शिक्षणात व आर्थिक सुबत्तेत अग्रेसर आहेत, असेही त्यांनी सांगितले.



**पुणे : श्री क्षेत्र आळंदी येथे पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, तसेच डॉ. सतीश भोईर, डॉ. किरण पाटील, डॉ. स्वप्नील भोईर, नरेश पाटील यांच्या वतीने मेडिकल कॅम्प आयोजित करण्यात आला होता.**



**नवी मुंबई : आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या वसतिगृहात गृहपाल या पदावर कार्यरत असलेले दयानंद निवृत्ती लोणे यांचे वन डे मॅरेज हे पुस्तक नुकतेच प्रकाशित करण्यात आले. यानिमित्त त्यांनी कोकण विभागीय माहिती कार्यालय येथे सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांनी त्यांच्या या पुस्तकाची प्रत कोकण विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक डॉ. गणेश मुळे, रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, ठाणे जिल्हा माहिती अधिकारी नंदकुमार वाघमारे, पालघर जिल्हा माहिती अधिकारी राहुल भालेराव, विभागीय माहिती कार्यालयाचे माहिती सहाय्यक प्रवीण डोंगरदिवे यांना म्हणून भेट दिली.**



**पनवेल : येथे मराठा क्रांती स्वराज्य संघटना कोकण प्रदेश कार्यालयाचे उद्घाटन व दिनदर्शिका वाटप मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.**

# भारतीय मजदूर संघाच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**उरण : बातमीदार**

भारतीय पोर्ट डॉक मजदूर संघाचीराष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक शुक्रवारी (दि. १८) नवी दिल्ली वेस्टर्न कोर्ट शासकीय विश्रामगृहात झाली. या बैठकीमध्ये देशातील नऊ बंदरातील कामगार नेत्यांनी भाग घेतला.



बैठकीमध्ये सर्व देशातील बंदरांमध्ये गुप्त मतदान घेण्यात यावे, खासगीकरणाविरोधी आंदोलन स्थानिक पातळीवर करण्याचा ठराव करण्यात आला. नवीन वेतन करार लवकरात लवकर करण्यात यावा, विविध पोर्टमध्ये नवीन कामगार भरती करण्यात यावी याबाबत चर्चा करण्यात आली.

बैठकीमध्ये राष्ट्रीय महासंघाचे अध्यक्ष प्रदीप बिजली, महासंघाचे प्रभारी अण्णा धुमाळ, राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, कोषाध्यक्ष सुधीर घरत, के. के. विजय तसेच पारद्वीप पोर्ट भुवनेश्वर (ओरिसा) येथे श्रीकांत राय, जेएनपीटी येथे रवी पाटील या दोन्ही ठिकाणी भारतीय मजूर संघाचे निवडून आलेले विश्वस्तांच्या अभिनंदन ठराव घेण्यात आला. येणाऱ्या काळामध्ये भारतीय मजदूर संघाची कार्यवाढ व कार्यविस्तार व्हावा यासाठी सर्व बंदरांमध्ये प्रवास करणे आवश्यक आहे, कंत्राटी कामगारांना संघटित करून त्यांना न्याय देण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र यावे, असा ठरविण्यात आला. आगामी काळात राष्ट्रीय मजदूर संघाचा सर्व बंदरांमध्ये झेंडा लागेल, असा विश्वास संघाचे महामंत्री सुरेश पाटील यांनी व्यक्त केला. प्रस्तावना सुरेश पाटील, सूत्रसंचालन सुधीर घरत, मार्गदर्शन अण्णा धुमाळ यांनी केले. कार्यक्रमास रवी शंकरन, सुधीर तीवरेकर, मणीकंठण, विघ्नेश नाईक, मधुशेठ पाटील, जनार्दन बंडा, राजेंद्र घरत आदी उपस्थित होते. आभार प्रदीप बिजली यांनी मानले.

# कर्नाक पुलाचे पाडकाम पूर्ण

## मध्य रेल्वेवरील लोकल सेवा पूर्ववत

**मुंबई : प्रतिनिधी**

कर्नाक पुलाचे पाडकाम रविवारी (दि. २०) पूर्ण झाले. त्यामुळे मध्य रेल्वेची लोकल सेवा दुपारी चार वाजता पुलाच्या कामानंतर सीएसएमटी ते ठाणे लोकल धावायला सुरुवात झाली. तत्पूर्वी कर्नाक आणि कोपरी पूल हटवण्यासाठी रेल्वेकडून विशेष ट्रॅफिक आणि पॉवरब्लॉक घेण्यात आला होता. हार्बर लाईनवरील काम सुरू असून रात्री ८ वाजल्यानंतर लोकल सेवा सुरू करण्यात आली.

मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी शिवाजी सुतार यांनी, कर्नाक पुलाचे पाडकाम शनिवारी रात्री ११ वाजल्यापासून सुरू झाले. अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने २७ तासांच्या मेगाब्लॉकमध्ये १७ तासांतच मेनलाईनची लोकल सेवा सुरू करण्यात आली आहे, तसेच हार्बर लाईनची लोकल सेवा ठरलेल्या वेळेनुसार म्हणजेच रात्री ८ वाजता सुरू केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.



दरम्यान, सीएसएमटी-मशीद बंदर रेल्वे स्थानकादरम्यान धोकादायक कर्नाक उड्डाणपुलाचं पाडकाम करण्यासाठी तब्बल २७ तासांचा मेगाब्लॉक घेण्यात आला होता. यासाठी मध्य रेल्वे मुख्य आणि हार्बर मार्गावरील एक हजार ९६ लोकल फेऱ्या रद्द करण्यात आल्या होत्या. ठाण्याकडून मुंबईकडे आणि मुंबईकडून ठाण्याकडे जाणाऱ्या वाहनचालकांना कोपरी ब्रिजजवळ दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते.

या वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी कोपरी ब्रिजच्या रुंदीकरणासाठी एकूण सात गर्डर टाकण्यात येणार आहे.

## दुखवटा



### रामचंद्र सानप

**पाली** : संभे येथील वाईल्डर वेस्ट ॲडव्हेंचर टीमचे प्रमुख महेश सानप यांचे वडील रामचंद्र सानप यांचे वयाच्या ८०व्या वर्षी निधन झाले. रामचंद्र सानप हे समाजाभिमुख व सर्वपरिचित व्यक्तिमत्व होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी व सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधीस विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांचा दशक्रिया विधी सोमवारी (दि. २८) तर उत्तरकार्य गुरुवारी(दि. १) रोजी राहत्या घरी होणार आहे.

## पनवेल अर्बन बँक निवडणूक

# भाजपप्रणित उत्कर्ष पॅनलचा जोरदार प्रचार





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल अर्बन बँकेची निवडणूक असून या निवडणुकीकरिता भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांनी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या महिन्यात आपले उमदेवारी अर्ज दाखल केले. निवडणूक आता जवळ आली असल्याने भाजपप्रणित उत्कर्ष पॅनलच्या उमेदवारांनी पनवेलमध्ये जोरदार प्रचाराला सुरुवात केली आहे. उमेदवारांनी प्रभुआळी, घाटेआळी विभागातील प्रत्यक्ष मतदारांना भेटून प्रचार केला.

पनवेल अर्बन बँकेची निवडणूक एकूण १३ जागांसाठी होणार असून सर्वसाधारण आठ, महिला प्रतिनिधी दोन, अनुसूचित जाती, जमाती एक, इतर मागास एक, भटक्या विमुक्त जमाती, मागास प्रवर्ग एक अशा जागांचा समावेश आहे. नामनिर्देशन पत्राची छाननी २८ ऑक्टोबरला झाली, तर ३१ ऑक्टोबरला वैध नामनिर्देशित पत्राची सुची घोषित झाली. त्यानंतर १५ नोव्हेंबरला निशाणीचे वाटप झाले व २७ नोव्हेंबरला मतदान तर २८ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

या निवडणुकीतील सर्वसाधारण जागेसाठी अजय यशवंत कांडपिळे, बळीराम नारायण म्हात्रे, यतीन शशिकांत देशमुख, श्रीनंद मुकुंद पटवर्धन, भगवान तुकाराम मुकादम, असिफ हसन करेल, कृष्णा सिताराम पाटील, भगवान शंकर पाडेकर, महिला प्रतिनिधी म्हणून प्रमिला जयराम मुंबईकर, निकिता निवृत्ती नावडेकर, अनुसूचित जाती जमाती जागेसाठी महेंद्र जानू गायकवाड, इतर मागासवर्गीय जागेसाठी प्रल्हाद गोविंद केणी, भटक्या विमुक्त जमाती जागेकरिता सुहासिनी दिनेश केकाणे असे उमेदवार उभे आहेत.

पनवेल अर्बन बँक निवडणुकीसाठी भाजप प्रणित उत्कर्ष पॅनलने प्रत्यक्ष मतदारांना भेटून प्रचाराला सुरुवात केली. त्यावेळी उमेदवार सुहासिनी केकाणे, यतीन देशमुख, पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, सचिन पाटील, सचिन जाधव, मधुकर उरणकर, अंजली इनामदार आदी उपस्थित होते.

# कर्नाळा अभयारण्य जागतिक पर्यटनस्थळाच्या दिशेने

## आमदार महेश बालदी यांचे प्रयत्न; बोधचिन्हाचे अनावरण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील कर्नाळा पक्षी अभयारण्याचा लोगो तयार करण्यात आला आहे. स्पर्धात्मक पद्धतीने निर्माण करण्यात आलेल्या या बोधचिन्हाचे नुकतेच अनावरण झाले. रायगडचा पक्ष म्हणून जाहीर झालेल्या तिबोटी खंड्याचे मनमोहक चित्र त्यावर असल्याने पक्षप्रेमी आणि पर्यटकांना खऱ्या अर्थाने अभयारण्याचा बोध होणार आहे. दरम्यान, उरण विधानसभा मतदार संघात येणाऱ्या कर्नाळा अभयारण्याला जागतिक पर्यटनस्थळाचा दर्जा देण्यासाठी आमदार महेश बालदी यांनी तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे पाठपुरावा केला होता. अभयारण्याचे बोधचिन्ह तयार होणे ही त्याचीच पहिली पायरी असल्याचे म्हटले जात आहे.




मुंबईपासून काही तासाच्या अंतरावर असलेल्या कर्नाळा या निसर्गरम्य ठिकाणी वर्षभर मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. निसर्ग, हवेतील गारवा आणि शांतता यांचा संगम असलेल्या या अभयारण्यात दोन प्रकारची वने आहेत. याशिवाय, रानखाटीक, ठिपकेवाला सातभाई, कस्तुर, शिंपी, गिधाड, मुनिया, नाचन, सुगरण, बया, सुरेल, खाचू कवटा, राखी धोबी, भारतद्वाज यासारखे सुमारे १३४ प्रजातीचे स्थानिक तर ३८ प्रजातीचे स्थलांतरीय पक्षी आहेत. अभयारण्य परिसरात ओरीटयल टोग किंगफिशर अत्यंत आकर्षित असा स्थलांतरित पक्षी बाहेरील देशातून येतो. त्याला तिबोटी खंड्या असेही म्हटले जाते. साधारणत: मे महिन्याच्या शेवटी हा पक्षी या परिसरात येतो आणि सप्टेंबर महिन्यात पुन्हा परततो. श्रीलंका, मलेशिया, इंडोनेशिया मार्गे हा पक्षी भारतात येतो विशेषता कर्नाळा अभयारण्यामध्ये तो पावसाळ्यामध्ये राहतो. तिबोटी खंड्याला रायगडच्या पक्षाचा दर्जा देण्यात आला आहे. एकंदरीतच कर्नाळा अभयारण्यात येणारे पक्ष प्रेमी आणि पर्यटकांची संख्या वाढावी या अनुषंगाने वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जातात. अभयारण्याची ओळख आणि येथील पक्षांचा बोध व्हावा या उद्देशाने बोधचिन्ह स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संकेत मोरे या चित्रकाराच्या लोगोला प्रथम पसंती देण्यात आली. हेच बोधचिन्ह आता कर्नाळा पक्षी अभयारण्याची ओळख असणार आहे. या बोधचिन्हांचे अनावरण अभयारण्यात झाले. या वेळी उपवनसंरक्षक वन्यजीव ठाणे सरोज गवस, सहाय्यक वनसंरक्षक फणसाड नंदकिशोर कूप्ते, ए. ए. चव्हाण, मानद वन्यजीव रक्षक, कृपा पाटील, पर्यावरण तज्ज्ञ वर्षा रेड्डी, तांत्रिक सल्लागार व वनपरिक्षेत्र अधिकारी कर्नाळा पक्षी अभयारण्य एन. डी. राठोड आणि रेंज स्टाफ तसेच वन परिक्षेत्र अधिकारी फणसाड अभयारण्य टी. पी. काळभोर यांच्या सह कर्मचारी व पर्यटक उपस्थित होते.

दरम्यान, कर्नाळा अभयारण्य परिसर उरण विधानसभा मतदारसंघात आहे. परिणामी, स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून बोधचिन्ह अनावरण कार्यक्रमाला आमदार महेश बालदी यांना प्रोटोकॉलनुसार निमंत्रित करणे क्रमप्राप्त होते, मात्र अभयारण्य प्रशासनाने त्यांना एक दिवस अगोदर निमंत्रण दिले. किमान काही दिवस अगोदर याबाबत माहिती देणे आवश्यक होते. नियोजित दौऱ्यामुळे या कार्यक्रमाला उपस्थित राहता येणार नाही. तो स्थगित करून नव्याने तारीख निश्चित करावी अशाप्रकारे आमदार महेश बालदी आणि सूचित केले होते. त्या ठिकाणी सहमतीसुद्धा वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दर्शवली, मात्र प्रत्यक्षात कार्यक्रम ठरलेल्या दिवशीच करण्यात आला. या भूमिकेबाबत कल्हे ग्रामविकास परिस्थितीकी समितीचे उपाध्यक्ष भरत जुमलेदार यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

### फणसाड अभयारण्याचाही लोगो!

**कर्नाळा बरोबरच फणसाड अभयारण्याचे पर्यटन वाढीच्या दृष्टिकोनातून बोधचिन्ह तयार करण्यात आले आहे. याकरीता सुद्धा स्पर्धा झाली. सुनित म्हात्रे यांनी प्रथम क्रमांक पटकावला.**

# प्रेमसंबंधात अडसर असलेल्या पतीचे मारेकरी पोलिसांच्या ताब्यात



**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल, सेक्टर-१८ भागात १७ नोव्हेंबर रोजी घडलेल्या हत्या प्रकरणाचा छडा लावण्यात खांदेश्वर पोलिसांना यश आले आहे. या हत्या प्रकरणात मृत ओमर फारुक फकीर अहमद ब्यापारी (वय २२) याची हत्या त्याच्याच पत्नीने आपल्या प्रियकराच्या मदतीने घडवून आणल्याचे तपासात उघडकीस आले आहे. त्यानुसार पोलिसांनी या हत्या प्रकरणात मृत ओमरची पत्नी अस्मीरा खातून ब्यापारी (वय २४), तिचा बांग्लादेशी प्रियकर पप्पू उर्फ शफीक उल अहमद (वय २५) आणि त्याचे दोघे साथीदार अशा चार जणांना अटक केली आहे. न्यायालयाने या चौघांची पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

घटनेतील मृत ओमर फारुक मुळचा पश्चिम बंगालमधील असून त्याची पत्नी अस्मीरा खातून हिचा पूर्वी जहांगिर मोंडल याच्यासोबत विवाह झाला होता. त्याच्यापासून तिला सात वर्षांची मुलगी आहे. त्यानंतर अस्मीराने डिसेंबर २०२१ मध्ये पहिल्या पतीपासून घटस्फोट घेतल्यानंतर ओमरसोबत लग्न केले होते. त्यानंतर ते दोघे रोजगारासाठी नवीन पनवेल पोदी नं. २ मध्ये आले होते. या ठिकाणी ओमर मजुरी करून पत्नी आणि मुलीसह रहात होता. तर आरोपी पप्पू उर्फ शकील उल अहमद मुळचा बांग्लादेशी नागरिक असून तोदेखील कामानिमित्त पनवेलमध्ये आला होता. पप्पू आणि ओमरच्या पत्नीमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाल्याने पप्पुने ओमरला कायमचे सोडून त्याच्यासोबत राहण्यास अस्मीराच्या पाठीमागे तगादा लावला होता. अस्मीराने ओमरचा कायमचा काटा काढल्यानंतर त्याच्यासोबत लग्न करणार असल्याचे सांगितले होते. त्यामुळे पप्पू याने ओमरची हत्या करण्यासाठी पश्चिम बंगाल येथून आपल्या दोन साथिदारांना बोलावून घेतले होते. त्यानंतर या तिघांनी १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ओमरला नवीन पनवेल, सेक्टर-१८ मधील सिडको गार्डन जवळ गाठून त्याच्या गळ्यावर, मानेवर आणि तोंडावर धारदार हत्याराने वार करुन त्याची हत्या करून पलायन केले. त्यावेळी ओमरच्या पत्नीने हत्येच्या कटात सहभागी नसल्याचे दाखवत स्वतः खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. प्रियकर पप्पुने त्याला मारल्याचा संशय व्यक्त केला होता.

खांदेश्वर पोलिसांसह गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकानेदेखील या प्रकणाचा तपास सुरू केला होता. या तपासादरम्यान हत्येच्या कटात ओमरची पत्नी अस्मीरा आणि तिचा प्रियकर पप्पू या दोघांचा सहभाग असल्याचे आढळून आल्यानंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पश्चिम बंगाल येथे पळून जाण्याच्या तयारी असलेल्या तरीकुल महेश मंडल (१९) आणि किताबुल अब्दुल वाहिद मंडल (२७) या दोन आरोपींना गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली.

# पेरोलवर सुटलेल्या संजय कार्लेची हत्या

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील तारा गाव हद्दीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी लाल रंगाच्या ऑडी कारमध्ये मृतावस्थेत आलेल्या संजय मारुती कार्ले आढळून (वय ४५) यांच्यावर तीन गोळ्या झाडून त्यांची हत्या आल्याचे करण्यात उघडकीस आले आहे.



पनवेल तालुक्यातील तारा गाव हद्दीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी लाल रंगाच्या ऑडी कारमध्ये मृतावस्थेत आढळून आलेल्या संजय मारुती कार्ले (वय ४५) यांच्यावर तीन गोळ्या झाडून त्यांची हत्या करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. त्यानुसार पनवेल तालुका पोलिसांनी अज्ञात मारेकऱ्यांविरुध्द हत्यासह आर्म ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरु केला आहे. कार्ले यांच्यावर तळेगाव-दाभाडे पोलीस स्टेशनमध्ये फसवणुकीसह मोक्का अन्वये गुन्हा दाखल असून, सहा महिन्यांपूर्वी ते पेरोलवर बाहेर आले होते.

पुणेमधील तळेगाव दाभाडे भागात राहणारे मृत संजय कार्ले १८ नोव्हेंबर रोजी कामानिमित्त मुंबई शहरात जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडले होते. त्यानंतर १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास त्यांचा मृतदेह लाल रंगाच्या ऑडी कारमध्ये पनवेल तालुक्यातील तारा गाव हद्दीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत आढळुन आला होता.या वेळी पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात मृत संजय कार्ले यांच्यावर तीन गोळ्या झाडून त्याची हत्या केल्याचे आढळुन आले आहे.

दरम्यान, मृत कार्ले यांनी अनेकांची फसवणूक केली असून, त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करून त्यांना अटकदेखील केली होती. सहा महिन्यांपूर्वीच संजय कार्ले पेरोलवर सुटून आले होते. याच वैमनस्यातून संजय कार्ले यांची हत्या करण्यात आल्याचे बोलले जात आहे.




**पनवेल : शिवाजीनगर येथील नारायण नामदेव ठाकूर यांचे सुपुत्र विश्वास ठाकूर यांचा समिता मुंढेकर हिच्यासोबत शनिवारी शुभविवाह झाला. या सोहळ्यास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत वधुवरांस आशीर्वाद दिले. या वेळी शकुंतला रामशेठ ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटुंबीय उपस्थित होते.**

# महिनाभराचा आनंद प्रत्येक १७ तारखेला -बाळाराम म्हात्रे

**उरण : बातमीदार**

कोकण मराठी साहित्य परिषद, मधुबन कट्टाचे प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला विमला तलाव येथे कविसंमेलन होते. त्या त्या कवी संमेलनांचा वेगळा आनंद उरणचे आम्ही श्रोते घेतो, असे मत बाळाराम म्हात्रे यांनी मांडले. हे ८५वे कविसंमेलन कमलाकर म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. कार्यक्रमाचे रंगतदार सूत्रसंचालन म. का. म्हात्रे यांनी केले.

या वेळी प्रा. एल. बी. पाटील, चंद्रकांत मुकादम, बाळाराम म्हात्रे, अनंत पाटील, मोहनलाल म्हात्रे, नारायण भोईर यांनी विचार मांडले. कविसंमेलनात मारुती तांबे, मोहनलाल म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे, भगवान पोसू, अरुण शिवकर, सी. बी. म्हात्रे, अरुण म्हात्रे, संजय पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, अनंत पाटील यांच्यासह निमंत्रित कवी भरत पाटील, संग्राम दानवेकर यांनी कविसंमेलन बहारदार केले.






**नवीन पनवेल : मुंबईतील प्रतिष्ठित सामाजिक संस्था उत्तरांचल बंधू मंडळ, नवीन पनवेल तर्फे ज्येष्ठ नागरिक सभागृहात शुक्रवारी वृद्धांसाठी मोफत मास्क वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात गौरव बंशीधर गायरोला यांना उत्तराखंड गौरव पुरस्काराने सन्मानित करून समाजाला सकारात्मक दिशेने वाटचाल करण्याचा मंत्रही दाखवला. तसेच ६० ते ६५ जणांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि भविष्यातही असाच यशस्वी कार्यक्रम व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. युबीएमचे माजी सचिव गोविंद सिंग मेहता यांनी उपस्थितांचे आभार मानले.**

# अडगळीत पडलेल्या पुस्तकांना संजीवनी!

## संकल्प फाउंडेशनतर्फे सुरू होणार पुस्तकालय

**पनवेल : वार्ताहर**

संकल्प फाउंडेशनच्या वतीने पुस्तकालय सुरू करण्यात येत आहे. यामध्ये अडगळीत पडलेले त्याचबरोबर आपल्याला नको असणारे पुस्तक जमा करता येऊ शकतात. जेणेकरून ते इतरांना वाचनीय ठरतील अशा प्रकारचे आवाहन संस्थेच्या संस्थापिका वैशाली जगदाळे यांनी केले आहे.

पनवेल परिसरातील शालेय पाठ्यपुस्तकांची बुक बँक बनवणाऱ्या संकल्प फाउंडेशनने सुद्धा आग्रही भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. फाउंडेशनच्या संस्थापिका वैशाली जगदाळे यांनी संकल्प पुस्तकालय सुरू केले आहे. आपल्या घरामध्ये अडगळीत पडलेले त्याचबरोबर रद्दीत काढलेली पुस्तके या पुस्तकालयात जमा करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. जेणेकरून त्याचा वापर इतर वाचक करू शकतील त्यातून त्यांना ज्ञान आणि उपयुक्त माहिती प्राप्त होऊ शकते यामुळे आपण एक चांगला समाज घडवू शकू, अशा प्रकारचे मत संकल्प फाउंडेशन च्या संस्थापिका वैशाली जगदाळे यांनी व्यक्त केले आहे.

संकल्प फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या वाचनालयात जमा होणारी पुस्तके दहा दिवसांसाठी वाचकांना मोफत दिले जातील. त्यानंतर ते पुस्तक जमा करून दुसरे पुस्तक संबंधित वाचकाला उपलब्ध करून दिले जाईल. यामुळे वाचन संस्कृतीला एक प्रकारे प्रोत्साहन आणि प्रेरणा मिळेल. यातून संस्कारक्षम तसेच नैतिक मूल्यांची रुजवणूक करण्यास मदत होईल.

जर कोणाकडे थोर व्यक्तींचे चरित्र, गोष्टी, आत्मकथा, चारोळ्या आणि इतर प्रकारची पुस्तके असतील. आणि ते अडगळीत ठेवली असतील तर आपल्या संकल्प पुस्तकालय ती इतरांना वाचण्यास द्यावी . ही पुस्तके १० दिवस वाचन करून परत पुस्तकालयात जमा करण्यात येतील. हे पुस्तकालय सर्वांसाठी खुले आणि मोफत राहील पुस्तके जमा करण्यासाठी ८१०४७३८१०७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संकल्प फाउंडेशनच्या संस्थापिका वैशाली जगदाळे यांनी केले आहे.

# मालडुंगे फार्म हाऊसमध्ये चोरी

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील मालडुंगे येथील फातिमा फार्म हाऊस येथे चोरी झाल्याची घटना घडली आहे.

साद कादिर करेल यांचा मालडुंगे येथे फार्महाऊस आहे. त्या फार्म हाऊसच्या खिडकीचे ग्रील उचकटून चोरट्याने हजारो रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरट्याने पाच हजार रुपये किमतीचे मनगटी घड्याळ, साडेतीन हजार रुपयांचे चांदीचे ग्लास, तीन हजार ६०० रुपये रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला आहे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त पनवेलमध्ये तयारी

**पनवेल : वार्ताहर**

येत्या ६ डिसेंबर रोजी दादर येथे होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरीनिर्वाणदिना निमित्त पनवेलमध्ये जय्यत तयारी स्वाभिमानी रिपब्लिकन युथ पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे .

या संदर्भात स्वाभिमानी युथ अध्यक्ष महेश साळुंखे यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांची बैठक पनवेल येथे घेतली. पनवेल व रायगड जिल्ह्यातून हजारो भीम सैनिक दादर येथे अभिवादन करण्यासाठी जाणार आहेत. त्याचे नियोजन या बैठकीत करण्यात आले. त्याच प्रमाणे स्वाभिमानी रिपब्लिकन युथ पक्षाच्या वतीने ५ व ६ डिसेंबर या दिवशी दादर येथे येणाऱ्या सर्व भिम सैनिकांना मोफत भोजनाची व्यवस्था केली आहे. त्याची तयारी पनवेल तालुक्यातील देण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी दिली आहे.

## संपादकीय

# कडक कायद्याची गरज

वसईतील तरुणी श्रद्धा वालकर हिची तिचाच प्रियकर आफताब अमीन पुनावाला याने राजधानी दिल्लीत केलेल्या निर्घृण हत्येने सारा देश हादरला. या हत्याकांडात दररोज नवनवीन खुलासे होत आहेत. दरम्यान, राज्याचे महिला व बालविकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी लव्ह जिहादविरोधात कडक कायदा तयार करण्याची घोषणा केली आहे.

**एखादी व्यक्ती किती विकृत असू शकते हे आफताबने केलेल्या श्रद्धाच्या अंगावर काटा आणणाऱ्या हत्येतून दिसून आले. खरेतर प्रेम म्हणजे दोन पवित्र मनांचे मिलन. जेव्हा दोन अविवाहित व्यक्ती प्रेमात पडतात तेव्हा त्यांच्यासाठी तो आनंदाचा काळ असतो, पण २६ वर्षीय श्रद्धा वालकर नावाच्या तरुणीबाबत घडलेला प्रसंग प्रेमावरचा विश्वास उडवणाराच म्हटला पाहिजे. श्रद्धाचा तिचाच प्रियकर आफताबने दिल्लीत खून करून मृतदेहाचे ३५ तुकडे केले आणि ते काही दिवस फ्रीजमध्ये ठेवून नंतर जंगल भागात विविध ठिकाणी फेकून दिले. सहा महिन्यानंतर या प्रकार उघडकीस आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. श्रद्धा आणि आफताब यांच्यात कामाठिकाणी ओळखीतून जवळीक वाढली आणि त्याचे रूपांतर प्रेमामध्ये झाले. आफताबची जात वेगळी असल्याने साहजिकच श्रद्धाच्या घरून या नात्यास सुरुवातीला विरोध झाला, पण मुलीच्या प्रेमापोटी तिच्या पालकांनी आफताबच्या घरच्यांशी लग्नाची बोलणी करण्याचा प्रयत्न केला होता, पण त्यांच्याकडून काही प्रतिसाद मिळाला नाही. उलट त्यांच्या नातेवाईकांनी अपमानित केल्याचा खुलासा आता श्रद्धाच्या वडिलांनी केला आहे. प्रेम आंधळे असे म्हटले जाते. प्रेमात बुडालेल्या व्यक्तीला बाहेरच्या जगाचे भान राहत नाही, पण त्यामुळे कळत-नकळत कधी कधी असे काही घडते की मग पश्चातापाशिवाय दुसरे काही उरत नाही. इथेतर प्रियकराने प्रेयसीचा जीव घेऊन जीवनकहाणीच संपवून टाकली. लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहत असलेले हे दोघे नंतर वसईतून दिल्लीत वास्तव्यास आले होते. दरम्यान, श्रद्धा ही आफताबकडे लग्नासाठी सातत्याने आग्रह धरीत असल्याने रागाच्या भरात त्याने तिचा खून केला. आफताबचे खरोखरच श्रद्धावर प्रेम असते तर त्याची मजल इथवर गेली नसती हे तर स्पष्ट आहे, पण मग श्रद्धानेही त्याला ओळखण्यात चूक केली हेही यातून अधोरेखित होते. ते लक्षात घेता प्रेम करताना समोरची व्यक्तीसुद्धा आपल्यावर मनापासून प्रेम करते का? की त्याचे केवळ आपल्या शरीरावर प्रेम आहे हे प्रत्येक मुलीने लक्षात घेतले पाहिजे. शिवाय तो भविष्यात आपला सांभाळ करेल का याचाही अंदाज घेतला पाहिजे. या संदर्भात पालक वारंवार आपल्या मुलांना समजावत असतात, पण त्यांचे ऐकते कोण? मग असे काही तरी अघटित घडते आणि वेळही निघून गेलेली असते. दरम्यान, या प्रकरणाची राज्याचे महिला व बालविकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी गंभीर दखल घेतली आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी लव्ह जिहादमुळे गैरकृत्य होत असल्याने लव्ह जिहादविरोधात कडक कायदा तयार केला जाईल, अशी घोषणा त्यांनी केली आहे. यापूर्वी उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश सरकारने तसा कायदा केला आहे. केवळ लव्ह जिहादच नव्हे; तर मुली-महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी कडक कायदे करण्याची वेळ आली आहे, ज्यामुळे भविष्यात कुणी असे कृत्य करण्यास धजावणार नाही. शिवाय समाजानेही कुठे काही गैर दिसत असेल तर आवाज उठविला पाहिजे. म्हणजे अशा घटनांना पायबंद होण्यास मदत होईल.**

# ग्रामीण भागात निवडणुकीचा धुरळा






राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२मध्ये मुदत संपणाऱ्या ७७५१ ग्रामपंचायतींची निवडणूक जाहीर केली आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील ५४० ग्रामपंचायतींचा समावेश आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील राजकीय वातावरण ऐन थंडीत तापू लागले आहे.

राज्यात सत्तापरिवर्तनानंतर पहिल्या टप्प्यात ७६०० ग्रामपंचायतींची निवडणूक झाली होती. आता दुसऱ्या टप्प्यात ७७५१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचा बिगूल वाजला आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व म्हणजे पनवेल, उरण, कर्जत, खालापूर, पेण, अलिबाग, मुरूड, रोहा, सुधागड, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, महाड, पोलादपूर या १५ तालुक्यांमध्ये ही निवडणूक होत आहे. सदस्यपदांसह थेट सरपंचपदासाठी लढत होईल. स्थानिक स्तरावरील ही निवडणूक आगामी जिल्हा परिषद संग्रामाची रंगीत तालीम मानली जात आहे. त्यामुळे गावागावात धुरळा उडू लागला आहे.

जिल्ह्यात सर्वच तालुक्यांमध्ये कमी-अधिक संख्येने ग्रामपंचायत निवडणूक होत आहेत. महाड तालुक्यात सर्वाधिक ७३, तर तळा तालुक्यात सर्वाधिक कमी म्हणजेच एका ग्रामपंचायतीची निवडणूक होत आहे. याशिवाय पेण तालुक्यात २६, माणगाव १९, उरण १८, पोलादपूर १६, खालापूर व सुधागड तालुक्यात प्रत्येकी १४, म्हसळा व श्रीवर्धन तालुक्यात प्रत्येकी १३, पनवेल तालुक्यात १०, कर्जत ७, अलिबाग ६ आणि मुरूड व रोहा तालुक्यात प्रत्येकी ५ अशा एकूण २४० ग्रामपंचायतींमध्ये निवडणुकीची धूम आहे.

कोरोना काळात सर्व काही ठप्प झाले होते. निवडणुकाही त्याला अपवाद नव्हत्या. त्यामुळे अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सध्या प्रशासक काम पाहत आहेत. रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचीही मुदत संपलेली आहे. याही निवडणुका येत्या काळात जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत निवडणूक ही चाचणी मानली जात आहे. अर्थात, ज्या तालुक्यांमध्ये जास्त ग्रामपंचायतींची निवडणूक होत आहे तेथील अंदाज निकालानंतर ढोबळमानाने येईल, मात्र कमी ठिकाणी निवडणूक होत असलेल्या तालुक्यांमध्ये असा आडाखा बांधता येणार नाही. आणखी एक बाब म्हणजे ग्रामपंचायत निवडणूक राजकीय पक्षांकडून लढली जात असली तरी इथे पक्षाचे निवडणूक चिन्ह नसते. शिवाय गावपातळीवरील समीकरणे लक्षात घेऊन काही ठिकाणी निरनिराळ्या युत्या-आघाड्या होत असतात. म्हणूनच या निवडणुकीची रंगत न्यारी आहे.

राज्यातील सत्ताबदलानंतर जिल्ह्यातील राजकारणही बदलले आहे. ठाकरे गटातील तीन आमदार आता शिंदे गटात आहेत. त्यांच्यासमोर बाळासाहेबांची शिवसेना हा त्यांचा पक्ष विस्तारण्याचे लक्ष्य आहे. काँग्रेस आणि शेतकरी कामगार पक्ष अस्तित्त्वासाठी झगडत आहेत. राष्ट्रवादीसमोरही टिकून राहण्याचे आव्हान आहे, तर भारतीय जनता पक्ष एक एक पाऊल टाकत मजबुतीने पाय रोवत आहे.

ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्षांनी आपापल्या परीने तयारी केली आहे. या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची मुदत २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर, छाननी ५ डिसेंबर, अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ७ डिसेंबर आणि त्याच दिवशी निवडणूक चिन्ह वाटप होणार आहे. मतदानाची तारीख १८ डिसेंबर असून २० डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होईल. सद्यस्थितीत प्रत्येक राजकीय पक्षाकडून उमेदवारांची चाचपणी व निवड प्रक्रिया सुरू आहे. अर्ज दाखल होऊन छाननी व माघारीनंतर प्रचाराला खऱ्या अर्थाने वेग येणार आहे.

**-समाधान पाटील, पनवेल**

## पनवेल अर्बन बँकेची लढत

ग्रामपंचायत निवडणुकीच्या धामधुमीत पनवेलमध्ये अर्बन बँकेचीही पंचवार्षिक निवडणूक होत आहे. जिल्ह्यातील कर्नाळा बँकेसह अन्य बँकांमध्ये झालेले आर्थिक घोटाळे बघता ठेवीदार असलेल्या सर्वसामान्य नागरिकांचा सहकारी बँका चालविणाऱ्या प्रस्थापित राजकीय पक्षांवरचा विश्वास उडालेला आहे. त्यामुळेच पनवेल अर्बन बँकेत या वेळी परिवर्तनाचे वारे वाहू लागले आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात सहकार चळवळ रूजली. 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या संत तुकाराम महाराजांच्या उक्तीनुसार राज्यात पश्चिम महाराष्ट्राने सहकार क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी बजावली. त्यामुळे शेतीसह पूरक उद्योगधंद्यांतून हातावर पोट असणारे शेतकरी, कष्टकऱ्यांना बळ मिळाले. रायगड जिल्ह्यातही सहकारी तत्त्वावर बँका सुरू करण्यात आल्या. यामध्ये अनेकांनी आपल्या आयुष्याची पुंजी मोठ्या विश्वासाने जमा केली, मात्र अपप्रवृत्तींमुळे कालांतराने या बँका दिवाळखोरीत निघाल्या. तब्बल ५५० कोटी रुपयांचा घोटाळा झालेली कर्नाळा बँक याचे ढळढळीत उदाहरण आहे. १९६५ साली स्थापना झालेली व हीरक महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणारी आणखी एक पनवेल अर्बन बँकही निरंकुश सत्तेमुळे प्रगती करू शकली नाही. हल्लीच्या डिजिटल युगात साध्या सेवादेखील या बँकेकडून ग्राहकांना देण्यात आलेल्या नाहीत.

पनवेल अर्बन बँक निवडणुकीत भाजपप्रणित उत्कर्ष पॅनल आणि महाविकास आघाडीचे सहकार पॅनल यांच्यात लढत आहे. 'सहकारातून स्वाहाकार' झालेल्या कर्नाळा बँक घोटाळ्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी निवडून देण्याची साद उत्कर्ष पॅनेलच्या उमेदवारांकडून मतदारांना घातली जात आहे. सुज्ञ मतदार पारदर्शक कारभार व समृद्धीसाठी साथ देतील, असा त्यांना विश्वास आहे. या निवडणुकीसाठी येत्या रविवारी म्हणजेच २७ नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून दुसऱ्या दिवशी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होईल.



## बदलते तंत्रज्ञान

### व्हॉट्सअॅपमधील ग्रुपमध्ये आता घडवता येणार पोल



अलिकडे व्हॉट्सअॅप आपल्या युजरसाठी अनेक जबरदस्त फीचर्स लॉंच करत आहेत. व्हॉट्सअॅपने एकापेक्षा अधिक फोनवर एकच खाते उघडण्याचे फीचर उपलब्ध करून दिले आहे. तसेच, ग्रुपमध्ये सुद्धा १ हजारपेक्षा अधिक सदस्यांचा समावेश करण्याची सोय केली आहे. यासह व्हॉट्सअॅपने युजर्सना पोल तयार करण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. आता युजर व्हॉट्सअॅपवर पोल तयार करू शकतात.
पोलचा पर्याय व्हॉट्सअॅप वेबवर दिसला नाही, मात्र ते लवकरच उपलब्ध होऊ शकते. पोल वैयक्तिक आणि ग्रुप चॅटवर उपलब्ध आहे. युजर एका पोलमध्ये १२ किंवा त्यापेक्षा कमी पर्याय टाकू शकतात. बारापेक्षा अधिक पर्याय दिल्यास व्हॉट्सअॅप याबाबत तुम्हाला इशारा देईल.

**असे बनवा पोल**

पोल फीचर वापरण्यासाठी तुम्ही व्हॉट्सअॅप अपडेट करणे गरजेचे आहे. अपडेट केल्यानंतर अॅप उघडा आणि वैयक्तिक किंवा ग्रुप चॅट उघडा.

आयओएसमध्ये जेथे तुम्ही टाईप करता त्या चॅट बॉक्सच्या शेजारी असलेल्या प्लस चिन्हावर टॅप करा.

अँड्रॉइडमध्ये चॅट बॉक्सचा भाग असलेल्या पेपरक्लिप चिन्हावर टॅप करा. दोन्ही प्रक्रियेत तुम्हाला मेन्यू उघडल्याचे दिसेल.

यादीत शेवटी तुम्हाला पोल हा पर्याय दिसून येईल. पोल या पर्यायावर टॅप करताच नवा मेन्यू ओपन होईल.

व्हॉट्सअॅप तुम्हाला पोलसाठी प्रश्न देण्यास आणि उत्तरे जोडण्यास सांगेल. व्हॉट्सअॅप उत्तर म्हणून १२ पर्याय देत असल्याचे दिसून आले आहे.

पोल झाल्यानंतर सेंडवर टॅप करा. ग्रुप किंवा चॅटमधील सहभागी युजर्सना नंतर पोलमधील उत्तरे निवडता येतील.

(नेटफ्लिक्सचा पासवर्ड शेअर केलाय? नको असलेल्या लोकांना असे करा साईन आऊट)

मतदान पाहण्यासाठी पोलमध्ये पर्याय देण्यात आला आहे. व्हॉट्सअॅप प्रतिसादाच्या पुढे मतांची संख्या देखील दर्शवते. ग्रुपच्या अॅडमिनसाठी हे फीचर फायदेशीर ठरू शकते. काही महत्वाच्या मुद्द्यांवर त्यांना पोल घडवता येऊ शकतील.

# भारतीय भौतिकशास्त्रज्ञ सी. व्ही. रामन



**निमित्त**

चंद्रशेखर वेंकटरामन हे भारतीय भौतिकशास्त्रज्ञ होते. २१ नोव्हेंबर १९७० हा त्यांचा स्मृतीदिन आहे. सी. व्ही. रामन यांचा जन्म तामिळनाडूमधील तिरुचिरापल्ली आणि शिक्षण चेन्नई येथे ७ नोव्हेंबर १८८८ रोजी झाला. त्यांनी कोलकाता विद्यापीठात १९१७-१९३३ भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. रामन हे काही काळ बंगलोरातही होते, १९४७ साली ते रामन संशोधन संस्थेचे संचालक झाले. रमणचे ६ मे १९०७ रोजी लोकासुंदरी अम्मल (१८९२-१९८०) बरोबर लग्न झाले होते. त्यांना चंद्रशेखर आणि रेडिओ-खगोलशास्त्रज्ञ राधाकृष्णन हे दोन पुत्र होते.

रमण हे चंद्रशेखर सुब्रह्मण्यन यांचे काका होते. त्यांना १९३१मध्ये' चंद्रशेखर मर्यादे'च्या शोधासाठी (चंद्रशेखर लिमिट) आणि तारकीय उत्क्रांतीसाठी आवश्यक असलेल्या अणू प्रतिक्रियेवर त्यांनी केलेल्या त्यानंतरच्या कार्यासाठी भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार (१९३०) मिळाला.

सी. व्ही. रामन यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि य्या खनिजांच्या प्रकाश-विकिरणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना काही साहित्या देशभरातून व विदेशातून भेट म्हणून मिळाले. नमुन्यांचा अभ्यास करण्यासाठी सी. व्ही. रामन तो अनेकदा लहान हाताळण्याएवढा स्पेक्ट्रोस्कोप घेऊन जात असत.

हिंदू तमिळ ब्राह्मण पालकांच्या पोटी जन्मलेला रमण हा एक अनमोल मुलगा होता. त्याने सेंट अलॉयसियसच्या अँग्लो-इंडियन हायस्कूलमधून १ अनुक्रमे ११ आणि १३ वर्षांचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. वयाच्या १६व्या वर्षी प्रेसिडेन्सी कॉलेजमधून भौतिकशास्त्रात सन्मानाने त्यांनी मद्रास विद्यापीठात पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला. पदवीधर विद्यार्थी असताना १९०६ साली त्यांचा पहिला संशोधन पेपर प्रकाशित करण्यात आला. पुढच्या वर्षी त्यांनी एम. ए.ची पदवी मिळवली. कोलकाता येथील इंडियन फायनान्स सर्व्हिसमध्ये असिस्टंट अकाउंटंट जनरल म्हणून रुजू झाले तेव्हा ते १९ वर्षांचे होते. तेथे त्यांची इंडियन असोसिएशन फॉर द अप्लाइन्शन ऑफ सायन्स (आयएसएस)२ या भारतातील पहिल्या संशोधन संस्थेशी ओळख झाली, ज्यामुळे त्यांना स्वतंत्र संशोधन करण्याची परवानगी मिळाली आणि ध्वनी आणि ऑप्टिक्समध्ये त्यांनी मोठे योगदान दिले.

१९१७मध्ये कलकत्ता विद्यापीठाच्या राजाबाजार विज्ञान महाविद्यालयात आशुतोष मुखर्जी यांनी त्यांना भौतिकशास्त्राचे पहिले पालित प्राध्यापक म्हणून नियुक्त केले. त्यांनी १९२६ मध्ये इंडियन जर्नल ऑफ फिजिक्सची स्थापना केली. त्याने आणि कृष्णन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी प्रकाश विखुरल्याची एक अभिनव घटना शोधून काढली, ज्याला त्यांनी सुधारित विखुरणे असे संबोधले, पण त्याला रामन परिणाम म्हणून ओळखले जाते. भारत सरकारतर्फे दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. रमण १९३३ साली बेंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये पहिले भारतीय संचालक बनले. तेथे त्यांनी त्याच वर्षी इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेसची स्थापना केली. त्यांनी १९४८ साली रामन रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना केली. तेथे त्यांनी शेवटच्या काळात काम केले.त्यांच्या रामन परिणाम (प्रकाशाचे मॉलिक्युलर स्कॅटरिंग) या शोधासाठी ते ओळखले जातात. १९३० चे भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक रामन यांना मिळाले होते.

**(साभार : विकीपिडीया)**

**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : तालुक्यातील वरसोली येथील आंग्रेकालीन श्रीविठ्ठल मंदिराच्या जत्रेला रविवारपासून सुरुवात झाली. आकाशपाळणे, खेळण्यांसह विविध दुकाने अशी मोठी रेलचेल या जत्रेमध्ये आहे. ही जत्रा पाच दिवस चालणार आहे.** (छाया : जितू शिगवण)

## आरोग्य प्रहर

### मुळा खाण्याचे काही तोटे



आरोग्य तज्ज्ञांच्या मते, रात्री कधीही मुळा खाऊ नये. याचे सेवन नेहमी दिवसा करावे. जर तुम्ही मुळा खाण्याचे शौकीन असाल आणि रात्रीच्या वेळी मुळा पराठा खात असाल तर तुम्हाला बद्धकोष्ठता, पोटदुखी अशा समस्यांना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे, सकाळच्या जेवणात मुळा खाणे अधिक फायदेशीर ठरू शकते. तर चला जाणून घेऊया मुळा खाण्याचे तोटे.

* ज्यांना कमी रक्तदाब आहे त्यांनी नेहमी जास्त मुळा खाणे टाळावे, कारण तुमचा रक्तदाब कमी झाल्यामुळे मुळ्याचे जास्त सेवन तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरेल.
* मुळामध्ये आढळणारे गोइट्रोजन नावाचे संयुग तुमच्या थायरॉईड ग्रंथीला नुकसान पोहोचवू शकते. त्यामुळे थायरॉईडच्या रुग्णांनी कच्च्या मुळ्याचे सेवन करू नये. कारण ते थायरॉईड संप्रेरकांमध्ये व्यत्यय आणू शकते आणि त्यांना हानी पोहोचवू शकते. म्हणूनच तुम्ही शिजवलेल्या मुळ्याचे सेवन करू शकता.
* रात्रीच्या जेवणात मुळ्याचे सेवन टाळावे, कारण त्यात लोहाचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे शरीरातील वेदना वाढू शकतात. जर तुम्हाला मुळा सॅलड म्हणून खायचा असेल तर त्यात इतर भाज्या मिसळून सेवन केल्यास फायदा होईल.
* जर तुम्ही सांधेदुखी आणि हाडांशी संबंधित समस्यांनी त्रस्त असाल तर तुम्ही मुळा कमी प्रमाणात सेवन करा. तसेच गर्भवती महिलांनी जास्त प्रमाणात मुळा खाणे टाळावे.
* तुमची रक्तातील साखर कमी झाली तरीही तुम्ही मुळा जास्त प्रमाणात सेवन करू नये, यामुळे हायपोग्लायसेमिया होऊ शकतो.
* मुळा ही भाजी गोईट्रोजेनिक पदार्थ आहे, जो थायरॉईड हार्मोनमध्ये बाधा आणते. जास्त सेवन केल्यास थायरॉईड हार्मोनची पातळी असंतुलित करू शकते. थायरॉईड असणाऱ्या व्यक्तींनी याचे जास्त सेवन करू नये.
* मुळ्याने रक्तातील साखरची पातळी कमी होते. यामध्ये हायपोग्लाइसेमिक असते. ज्यांना मधुमेह आहे त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच मुळ्याचे सेवन करावे.
* मुळ्यात लॅक्सेटिव्ह गुण आढळतात त्यामुळे अधिक सेवन केल्यास, पोटदुखी चालू होऊ शकते. ज्यांचे पोट संवेदनशील आहे त्यांनी मुळा खाणे टाळावे.

## पेण मनसेकडून काँग्रेस नेते राहुल गांधींचा निषेध

# प्रतिमेस जोडो मारो आंदोलन



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेदरम्यान स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर केलेल्या टीकेचे महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात तीव्र पडसाद उमटत असून पेणमध्ये रविवारी (दि. २०) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने राहुल गांधी यांचा निषेध व्यक्त करीत त्यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी मनसे तालुकाध्यक्ष रुपेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली पेण नगर परिषदेसमोरील चौकात आंदोलन करीत राहुल गांधी यांच्याविरोधात निषेधाच्या घोषणा दिल्या. या वेळी रुपेश पाटील यांनी सांगितले की, स्वातंत्र्यवीर सावकर यांच्याबद्दल खासदार राहुल गांधी यांनी जे अपशब्द वापरले आहेत त्याचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जाहीर निषेध करीत आहोत.

आंदोलनावेळी मनसे तालुका सचिव हिरामण जेधे, महिला तालुका सचिव रेखा तांडेल, तालुका उपाध्यक्ष रोहन पाटील, पेण शा. से अध्यक्ष आदित्य कदम, हमरापूर विभाग उपाध्यक्ष साहिल म्हात्रे, जिते विभाग अध्यक्ष गणेश म्हात्रे, पेण पूर्व विभाग अध्यक्ष ओमकार कचरे, कासू विभाग अध्यक्ष धनाजी म्हात्रे , हमरापूर विभाग उपाध्यक्ष महेंद्र पाटील, कळवे शाखा अध्यक्ष संदीप पाटील महाराष्ट्र सैनिक, अश्विनी ठाकूर, रुपेश पाटील, अतिश पाटील, सौरभ पाटील, आशिष मात्रे, प्रज्वल म्हात्रे, शिवम म्हात्रे,गौरव पाटील तसेच महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# अलिबागच्या वरसोलीतील जत्रेला प्रारंभ; भाविकांनी घेतले विठोबाचे दर्शन

(छाया : जितू शिगवण)





**अलिबाग : प्रतिनिधी**


अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील आंग्रेकालीन श्री विठ्ठल मंदिराच्या जत्रेला रविवारपासून (दि. २०) सुरुवात झाली. कोरोनामुळे दोन वर्ष यात्रा झाली नव्हती. यंदा विठूरायाच्या दर्शनासाठी भविकांनी पहाटेपासूनच गर्दी केली होती. ही जत्रा पाच दिवस चालणार आहे.

अलिबागच्या वेशीवर असलेल्या निसर्गरम्य वरसोलीमध्ये श्री विठ्ठल रखुमाईचे भव्य मंदिर आहे. राघोजी राजे आंग्रे यांनी हे मंदिर बांधले आहे. त्यांच्या पत्नी श्रीमंत नर्मदाबाई आंग्रे यांनी स्वखर्चाने शके १७०० माहे फाल्गुन शुक्ल ८ बुधवार या दिवशी (२४ फेब्रुवारी १७७९ रोजी) विठ्ठल व रखुमाई व गरुड यांच्या मुर्तींची प्रतिष्ठापना केली. श्रींची पूजा-अर्चा पहिल्यापासून आंग्रे कुटूंबीय करीत असत. आषाढी व कार्तिकी एकादशी उत्सव त्यांच्या खाजगी खर्चाने करीत असत. १८४० मध्ये उत्सवापूर्वी मदिराला रंगरंगोटी करीत असताना कळस कोसळला व त्याखाली सापडून रंगारी मरण पावला. त्याचवेळी आंग्रेंच्या हत्तीखान्याला आग लागून तो भस्मसात झाला. त्यामुळे कार्तिकी वद्य एकादशीपासून पाच दिवस देवाची यात्रा भरविण्यास सुरुवात झाली. आजही ती परंपरा कायम आहे.


कोरोनामुळे दोन वर्ष जत्रा झाली नव्हती. रविवारी पहाटेपासूनच भाविकांनी विठूरायाच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. काकड आरती, पूजा, भजन, कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांचे यानिमित्ताने आयोजन करण्यात आले होते.

जत्रेच्या निमित्ताने येणाऱ्या भाविकांना पाणी, स्वच्छतागृह ही सोयही वरसोली ग्रामपंचायत जत्रोत्सव कमिटीमार्फत करण्यात आलेली आहे. मंदिरात व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. पोलीस प्रशासनाकडूनही चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# नखांवरील कलाकुसरीला महिलांची पसंती



(छाया : सलीम शेख)



**माणगाव : प्रतिनिधी**

नखशिखांत सुंदर दिसण्यासाठी अलीकडच्या काळामध्ये ज्या अनेक कलांचा, उपचारांचा उपयोग केला जातो त्यामध्ये नखांवरील कलाकुसरीला अधिक पसंती मिळत आहे. नखे वाढविणे ही आवड अनेक दशकांपासून रूढ आहे, परंतु अलीकडच्या काळामध्ये सण समारंभ, उत्सव, लग्न कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रमांच्या निमित्ताने नखांवरील कलाकुसरीला (नेल आर्टला) महिलांची अधिक पसंती मिळत आहे.

वेगवेगळ्या पद्धतीने नखे सजविणे हा याचा अर्थ असून ज्याला आर्टिफिशियल नेल टेक्नॉलॉजी असे म्हणतात. या कलेचा उगम अमेरिकेत जवळपास ३० वर्षांपूर्वी झाला आहे. या कलेत नेलपेंट पासून छोटे तारे,मोती, रंग, रेडियम यांचा वापर केला जातो.अलीकडे नखांवरील कलाकुसरसाठी नेल पार्लर ही संकल्पना रूढ होत आहे. शहरांमध्ये मशीनचा वापर करून हवी ती डिझाईन नखांवर करता येते किंबहुना आवडता फोटोही नखांवर कोरता येतो. नखे सुंदर दिसण्यासाठी अगदी साध्या सोप्या पद्धतीचा, तर अगदी महागड्या पद्धतीने कलाकुसर करता येते. कमकुवत नखांसाठी,लांब लांब नखांसाठी विविध अशा आकर्षक डिझाईन्स करता येतात.

डिजिटल नेल आर्ट, फोरम नेल आर्ट , एक्रेरियल नेल आर्ट, निमल डॉट नेल आर्ट, ग्लीटरी नेल आर्ट, मिक्स अँड मॅच, पोल्का डॉट नेल आर्ट इत्यादी यामधील काही आकर्षक पद्धती आहेत .अलिकडच्या काळात नखांवरील नक्षी कलेला चांगली मागणी आहे. नखांचे सौदर्य वाढविण्यासाठी या कलेचा वापर केला जातो. रंग, स्टिकर्स, टिकल्या, मोती इत्यादीचा वापर करून हवी ती नक्षी तयार करता येते, असे सौदर्य सल्लागार प्राची झेमसे यांनी सांगितले.

# अधिकारी असल्याचे सांगून महाडमध्ये हॉटेल व्यावसायिकाला गंडा

**महाड : प्रतिनिधी**

अन्न आणि औषध प्रशासनाचे अधिकारी असल्याची बतावणी करीत एका बंटी आणि बबलीने महाड शहरातील हॉटेल व्यवसायिकाला ३५ हजार ८२० रुपयांचा गंडा घातला. या प्रकरणी व्यवसायिकांने महाड पोलीस ठाण्यामध्ये याबाबत तक्रार दाखल केली आहे.

रुपेश पवार हे शहरातील इंडियन डिलाईट हे चायनीज हॉटेल चालवतात. ५ नोव्हेंबरला दुपारी १२ वाजता त्यांच्या दुकानामध्ये नारायण सजणे नावाचा एक पुरुष व वानखेडे नामक एक महिला दाखल झाली. आपण अन्न आणि औषध प्रशासनाचे अधिकारी असल्याची बतावणी करीत या बंटी बबलीने रुपेश पवार यांना आपल्या हॉटेलबद्दल तक्रार असून दंड म्हणून ३५ हजार ८२० रुपये जमा करा असे सांगितले. दंडाचे हे पैसे या जोडीने रुपेश पवार यांच्याकडून गुगल पेने वानखेडे मॅडम यांच्या ९१७२२३४३११ या मोबाईल फोन क्रमांकावर ट्रान्सफर करून घेतले. काही दिवसानंतर रुपेश पवार यांना आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास येताच त्यांनी महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये धाव घेतली. शहर पोलीस ठाण्यात या प्रकरणी त्या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आदिवासी मुलांना ब्लँकेटचे वाटप

## इनरव्हील क्लबचा कर्जतमधील मोग्रज येथे उपक्रम

(छाया : विजय मांडे)



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील इनरव्हील क्लबने तालुक्यातील मोग्रज येथील आदिवासी मुलांसोबत बाल दिन साजरा केला. या वेळी आदिवासी मुलांना ब्लँकेट व खाऊचे वाटप करण्यात आले.

मोग्रज येथील स्वामीधाम मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ६५ आदिवासी मुलांना क्लबच्या वतीने ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष उत्तरा वैद्य, ज्योत्स्ना शिंदे, तन्वी जोशी, पल्लवी सावंत, सरस्वती चौधरी, मधुरा मुळे, संजीवनी घुमरे, साक्षी अडसुळे, करुणा पराडकर उपस्थित होत्या. तन्वी जोशी यांच्या वतीने मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले.

# कर्जतमध्ये पायी दिंड्यांनी वातावरण झाले भक्तीमय

**कर्जत : विजय मांडे**

रायगड जिल्ह्यातील अनेक वारकरी पंढरपूर, आळंदीची पायी वारी करतात. अनेक गावांतून पायी दिंड्या निघत असतात. असंख्य वारकरी या पायी दिंड्यांमध्ये सहभाग घेऊन पंढरपूर, आळंदीकडे जात असतात. त्यांचे त्या मार्गातील गावातील ग्रामस्थ अगदी आस्थेने उत्साहात स्वागत करतात. कर्जत तालुक्यातूनही अनेक गावांतून पायी दिंड्या निघत असतात. त्यामुळे या काळात सर्वत्र विठूचा गजर ऐकायला मिळतो आणि वातावरण भक्तीमय होते.

आषाढी यात्रेच्या वेळी वारकरी पंढरपूरला आणि कार्तिकी यात्रेच्या वेळी आळंदीला वारकरी जात असतात. कार्तिक महिन्यातील दोन्ही एकादशी कर्जत व खालापूर तालुक्यांसाठी विशेष महत्वाच्या आहेत, कारण कार्तिक महिन्यातील पहिल्या म्हणजे प्रबोधिनी एकादशीला साजगाव येथील विठ्ठल मंदिर परिसरात यात्रा भरते ती साधारणपणे दहा-बारा दिवस असते. या यात्रेला बोंबल्या विठोबाची यात्राही म्हणतात. या यात्रेला जिल्ह्यातील भाविक येतात. विशेषकरून माहेरवाशिणी या यात्रेसाठी आवर्जून येतात आणि विठू माऊलीचे दर्शन घेऊन यात्रा फिरून मग आपल्या घरी जातात.

दुसऱ्या एकादशीला म्हणजे उत्पत्ती एकादशीला कर्जत तालुक्यातील नगर परिषद हद्दीत असलेल्या दहिवली गावातील विठ्ठल मंदिर परिसरात यात्रा भरते. येथेही तालुक्यातील भाविक आवर्जून येऊन श्री विठ्ठलाचे दर्शन घेतात. येथेही माहेरवाशिणी आवर्जून हजेरी लावतात. ही यात्रा लहान मुलांची आवडती यात्रा म्हणून प्रसिद्ध आहे. ही यात्रा आठ-दहा दिवस सुरू असते. या यात्रेत पालखी मिरवणूक असते. एखादे स्थानिक कलाकारांच्या नाटकाचेही आयोजन केले जाते. त्यानंतर तालुक्यातील भालीवडी येथे यात्रा भरते. येथे पूर्वी बैलगाडीच्या शर्यती, कबड्डी स्पर्धा होत असत, तर आदिवासी लोकांची पारंपरिक नृत्यांचे आयोजनसुद्धा येते होत असे. ही यात्रादेखील अगदी आठ दिवस असते. या वेळी पालखी मिरवणूक काढून ग्रामस्थ श्रींचे दर्शन घेतात.



कर्जत तालुक्यातील बहुतांश गावात विठ्ठल मंदिर आहे. त्यापैकी सुमारे ५० गावांत अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करून व प्रसिद्ध कीर्तनकारांना आमंत्रित करून प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला जातो. कर्जत परिसर ज्ञानयज्ञ सोहळा समितीद्वारे गेली ४५ वर्ष नामवंत किर्तनकारांना निमंत्रित करून हरीनाम सप्ताहाचे आयोजन केले जात आहे. ह. भ. प. बाबामहाराज सातारकर यांनाही काही वर्षांपूर्वी निमंत्रित केले होते. पंढरपूर व आळंदी यात्रेसाठी तालुक्यातून हजारो वारकरी पायी वारी साठी जात असतात. यंदाच्या आळंदी वारीला दहिगाव, वासरे खोंडा, खांडस, कशेळे आदी भागांतून पायी दिंड्या गेल्या आहेत. महत्वाचे म्हणजे ह. भ. प. दादा महाराज राणे आणि ह. भ. प. मारुती महाराज राणे यांच्या नेतृत्वाखाली कोंकण दिंडीचे आयोजन केले जाते. जिल्ह्यातून आलेल्या बहुतांश दिंड्या खोपोलीनंतर या कोकण दिंडीबरोबरच आळंदीकडे प्रस्थान करतात.

कर्जत तालुक्यात समाज प्रबोधनासाठी जसा वारकरी संप्रदाय आहे. तसेच प. पू. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या श्रीसदस्य बैठकीच्या माध्यमातून जिल्हा नव्हे; तर राज्यभरात बैठकींच्या माध्यमातून प्रत्येक आठवड्यातील ठरलेल्या वारी समाज प्रबोधन करण्याचे कार्य केले जाते.

वैजनाथ येथे सद्गुरू वामनराव पै यांनी स्थापन केलेल्या जीवन ज्ञानपीठमध्येसुद्धा अनेक नामधरकांना प्रबोधन केले जाते. प. पू. पांडूरंगशास्त्री आठवले यांच्या स्वाध्यायच्या माध्यमातूनही अनेकांना प्रबोधन करण्यात येते. प. पू. अनिरूद्ध बापूंच्या मार्गदर्शनाखालीदेखील प्रबोधन कार्य सुरू आहे. प. पू. कलावती आईंच्या आशीर्वादाने अनेक भाविक प्रबोधनाचे कार्य करीत आहेत. याशिवाय अन्य माध्यमातूनही समाज जागृतीचे व प्रबोधनाचे कार्य करीत असतात. येथून महाड, शिर्डी, प्रति शिर्डी येथेही पायी दिंड्या जात असतात. त्यामुळे कर्जत तालुक्यातील वातावरण नेहमीच भक्तीमय असते.

**ॲड. आशा अरुणकुमार भगत**
**मोबाईल क्रमांक ८१०८३५५०००**

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**दि.चौ. अर्ज क्र. १६३३/२०२२**
**निशाणी क्रमांक ७ ड**
**ने.ता. ०४/०१/२०२३**

१. श्री. ॲडवर्ड इग्निशीयन फर्नांडीस
वय ५६ वर्षे धंदा-व्यवसाय
२. कुमारी शलीन ॲडवर्ड फर्नांडीस वय १३ वर्षे
धंदा- शिक्षण अ.पा.क. तर्फे श्री. ॲडवर्ड इग्निशीयन
फर्नांडीस सर्व रा. ४०२ बिनाका को. ऑ हौ.सो.लि.
प्लॉट क्रमांक १७ सेक्टर ८ ई कळंबोली
तालुका पनवेल जिल्हा रायगड
मुळ पत्ता पो आरोंदा घर क्रमांक १४९३
तालुका सावंतवाडी जिल्हा सिंधुदुर्ग महाराष्ट्र ४१६५१३ } अर्जदार

सदरहु अर्जदार क. १ यांची पत्नी व कमांक २ यांची आई कै. संताना ॲडवर्ड फर्नाडीस हे दिनांक ०२/०५/२०२१ रोजी गोवा मेडिकल कॉलेज गोवा येथे मयत झाले आहेत. त्यांच्या पश्यात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणुन नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब कै. संताना अँडवर्ड फर्नाडीस यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरहु अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे :-

कै. संताना ॲडवर्ड फर्नांडीस (मयत मुळ पत्नी )
↓
श्री. ॲडवर्ड इग्निशीयस फर्नांडीस (मयताचे पती)
↓
कुमारी शलीन ॲडवर्ड फर्नाडीस (मयताची मुलगी)

सदरहु कै. संताना ॲडवर्ड फर्नांडीस यांच्या मृत्युसमयी त्यांच्या नावाची नोंद असलेल्या सदनीकेचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मौजे कळंबोली तालुका पनवेल येथिल सदनिकेचे वर्णन**

| अपार्टमेंटचे नाव व क्रमांक | प्लॉट क्रमांक | सेक्टर क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|---|---|
| बिनाका को ऑ हौ.सो.लि. ४०२ | १७ | ८ ई | ४९,२९,००० /- |

सदरहू सदनिका कै. संताना ॲडवर्ड फर्नांडीस यांच्या नावे होती व ती व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदारांनी सिडको कार्यालयाकडे चौकशी केली असता असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे सदनिका आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात म्हणजेच कै. संताना ॲडवर्ड फर्नांडीस यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर भूखंड / सदनिका हस्तातरण करणेसाठी मे दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रीक बाबींचा अडथळा येवु नये हया कारणास्तव वरील मयत व्यक्तिंचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करुन मागत आहेत

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे.. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे.

**सही/-**
**क. लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

शिक्का

**सही/-**
**सह. अधीक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# गोवर रोखण्यासाठी नवी मुंबई सज्ज

## महापालिकेतर्फे लसीकरण सत्रांचे नियोजन




**गोवरचा विषाणू रुग्णांच्या खोकल्यातून किंवा शिंकेद्वारे हवेमार्फत पसरतो व संपर्कात आलेल्या व्यक्तीच्या श्वसन संस्थेतून शरीरात प्रवेश करतो. या रोगाची लक्षणे आढळल्यास घाबरुन न जाता नजीकच्या महानगरपालिकेच्या रुग्णालयास किंवा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दयावी तसेच गोवरचा उद्रेक टाळण्यासाठी ज्या पाच वर्षापर्यंतच्या बालकांना डोस घेता आला नाही अशा बालकांसाठी घरांना भेटी देणाऱ्या स्वयंसेवकांना आपल्या बालकांबाबत योग्य माहिती देऊन गोवर लस घेण्याबाबत संपूर्ण सहकार्य करा.**

**–राजेश नार्वेकर, आयुक्त, नवी मुंबई पालिका**

**नवी मुंबई : बातमीदार**

आसपासच्या शहरांमधील गोवरबाधीत मुलांची संख्या वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महापालिका सतर्क झाली आहे. महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार आरोग्य विभागामार्फत नागरी आरोग्य केंद्रनिहाय विशेष सर्व्हेक्षणाला सुरूवात करण्यात आलेली आहे. तसेच गोवर प्रतिबंधात्मक लसीकरण सत्रांचे नियोजन करण्यात आले आहे.

गोवर टाळण्यासाठी लसीकरण हा प्रभावी मार्ग असून नवी मुंबई महानगरपालिकेने सातत्याने लसीकरण सुरू ठेवल्याने एप्रिल २०२२ ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत नऊ महिने ते १२ महिने पर्यंतच्या १४२१५ बालकांना गोवर रुबेला लसीचा पहिला डोस दिलेला आहे. महापालिकेला दिलेल्या १३४२३ इतक्या पहिल्या डोसच्या उद्दिष्टापेक्षा जास्त बालकांचे लसीकरण करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे १६ ते २४ महिने वयोगटातील १३१७२ बालकांचे दुसऱ्या डोसचे लसीकरण झालेले आहे. त्यामुळे नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील गोवर बाधीतांचे प्रमाण काहीसे मर्यादित आहे.

तथापी इतर शहरांमधील स्थिती लक्षात घेता नवी मुंबई महानगरपालिका दक्ष झाली असून महानगरपालिका कार्यक्षेत्रात संशयीत गोवर रुग्ण शोधण्यासाठी नागरी आरोग्य केंद्रनिहाय ३० नोव्हेंबर पर्यंत विशेष सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे. नमुंमपा कार्यक्षेत्रातील ० ते ५ वर्षे वयोगटातील लस घेण्याचे राहून गेलेल्या लाभार्थ्यांना लसीकरण करण्यासाठी १७५ अतिरिक्त लसीकरण सत्रांचे नियोजन करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या माँसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालय, नेरूळ येथे तळमजल्यावर आठ रुग्णखाटांचा विशेष विलगीकरण कक्ष गोवर झालेल्या बालकांसाठी स्थापित करण्यात आलेला आहे. याबाबत महानगरपालिका क्षेत्रातील बालरोग तज्ज्ञांचे विशेष प्रशिक्षण जागितक आरोग्य संघटनेचे विशेष समन्वयक डॉ. अरुण काटकर यांनी उजळणी प्रशिक्षण घेतले आहे. अशाच प्रकारे महानगरपालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी तसेच बालरोगतज्ज्ञ, स्टाफ नर्स, एल. एच. व्ही., ए.एन.एम. यांचेही उजळणी प्रशिक्षण घेण्यात आलेले आहे.

प्रत्येक शासकीय रुग्णालयांमध्ये लस मोफत उपलब्ध आहे. लसीकरणाच्या वेळापत्रकाप्रमाणे लसीकरण केल्यास गोवर रोग टाळता येतो. बालकांचे गोवर/रुबेला लसीकरण झाले नसेल त्यांचे लसीकरण करुन घेणे आवश्यक आहे.

गोवर हा विषाणूपासून होणारा साथीचा आजार असून विषाणूने शरीरात प्रवेश केल्यानंतर ७ ते १० दिवसांनी लक्षणे दिसण्यास सुरुवात होते. लक्षणांमध्ये सुरुवातीला ताप व खोकला, सर्दी, डोळे लाल होणे यापैकी एक, दोन किंवा तीनही लक्षणे दिसतात. सुरुवातीची लक्षणे दिसल्यानंतर २ ते ४ दिवसांनी अंगावर पुरळ दिसू लागते. पुरळ कानाच्या मागे सुरु होऊन नंतर चेहरा, छाती, पोट व पाठ या ठिकाणी पसरते.

गोवर झालेल्या रुग्णाच्या शरीरातील अ – जीवनसत्वाचे प्रमाण कमी होऊन त्यामुळे रुग्णाला डोळ्यांचे आजार व अतिसार, न्युमोनिया, मेंदूज्वर असे आजार होऊ शकतात. गोवर झालेल्या रुग्णास लागोपाठ दोन दिवस अ – जीवनसत्वाची मात्रा दिल्यास हे आजार होण्याची शक्यता कमी असते.



# विद्याभवन शिक्षण संकुलात शिशुविहारसह व्यायामशाळा सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात शैक्षणिक विकासाबरोबरच मुलांच्या शारीरिक विकासासाठी शिशुविहार आणि व्यायामशाळेचे उद्‌घाटन संस्थेचे माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे आणि कल्पना शिरकांडे यांच्या हस्ते संचालक तसेच सर्व माजी मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या उपस्थितीत करण्यात आले.

शालेय परिसरात शिशुविहार आणि व्यायामशाळेच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमात संस्थेचे माजी कोषाध्यक्ष आणि संचालक राजेंद्र बोऱ्हाडे यांनी या शिक्षण संकुलाच्या प्रगतीची प्रशंसा केली आणि पुढील विकास उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. नवी मुंबईत दर्जेदार शिक्षण देणारे शिक्षण संकुल अशी ओळख अल्पावधीतच निर्माण करण्यात संचालक दिनेश मिसाळ यांचा सिंहाचा वाटा आहे असे मत राजेंद्र बोऱ्हाडे यांनी व्यक्त केले. संचालक दिनेश मिसाळ यांनी संस्थेच्या जडणघडणीत मोलाची भूमिका असणाऱ्या स्व. डॉ. शं. पां. किंजवडेकर यांचे स्मरण करून विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे आभार मानले.

या कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी मंडळाचे सचिव तुकाराम दौंडकर, माजी मुख्याध्यापक शिवाजी माळी, पांडुरंग मुळीक, शुभांगी जाधव, विजया गणेश, साधना कुलश्रेष्ठ, सरला नरेंद्रन, सरस्वती रामचंद्रन, ख्यातनाम क्रीडा शिक्षिका निर्मला भांडारकर तसेच मुख्याध्यापक राजेंद्र ढेरगे, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नूतन गवांदे यांनी केले.

# उरण येथील सेंट मेरी हायस्कूलमध्ये चित्र प्रदर्शन



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील उरण शहरातील इंग्रजी माध्यमाच्या सेंटमेरी कॉन्व्हेंट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज हायस्कूलमध्ये नुकतेच शाळेतील विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांचे व रांगोळी प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन हायस्कूलचे मॅनेजर मार्शल लोपीस फादर यांच्या हस्ते करण्यात आले.

व्यक्ती चित्र, निसर्ग चित्र व रांगोळी काढण्यात आली होती. पाचवी ते बारावीतील एकूण ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या वेळी कॉलेजच्या प्राचार्य सिस्टर मेरी, सुपरवायझर संगीता पाटील, प्राथमिकचा रिबेका डिसोझा, शिक्षकवर्ग, स्टाफ विद्यार्थी आदी उपस्थित होते.

चित्रकलेचे शिक्षक संतोष पाटील यांच्या विद्यार्थ्यांनी अनेक प्रकारची सुंदर व सुबक अशी चित्रे काढून आपली कला दाखविली होती. विद्यार्थ्यांनी मेहनत घेऊन काढलेल्या चित्रांची माहिती व त्यांची कला सर्वांना माहिती व्हावी या हेतूनेच ओपन हाऊस डे या दिवशी हायस्कूलच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांचे व रांगोळी प्रदर्शन ठेवण्यात आले होते.

# नवी मुंबईतील गृहनिर्माण संस्थेला मार्गदर्शन | सहकार सप्ताह निमित्त उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

सहकार भारती नवी मुंबई व सहनिबंधक सहकारी संस्था सिडको, बेलापूर नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. १८) सिडको कार्यालय बेलापूर येथील सहनिबंधक सहकारी संस्था येथे सहकार सप्ताहानिमित्त गृहनिर्माण संस्थेबाबत मार्गदर्शन कार्यकम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहनिबंधक सहकारी संस्थेच्या संगीता डोंगरे तसेच सहकार भारतीचे जिल्हा अध्यक्ष प्रमोद जोशी, तसेच सहकार भरतीचे सचिव ॲड. चंद्रकांत निकम व नवी मुंबई हौसिंग फेडरेशनचे सचिव भास्कर म्हात्रे यांनी उपस्थित विविध सहकारी संस्थेच्या पदाधिकारी, सभासद, लेखापरीक्षक, वकील व इतर उपस्थितांना सहकारी कायदा त्याचसोबत उपविधी व शासनाने काढलेल्या वेगवेगळ्या परिपत्रकांची माहिती सादर केली.



संगीता डोंगरे यांनी संस्थेत एमसीएस कायद्याचे कलम २४ अ प्रमाणे जास्तीत जास्त प्रशिक्षण घेण्याबाबत व शासनाच्या वेगवेगळ्या योजना सर्व सभासदांपर्यंत पोहचविण्यासाठी वेगवेगळे उपक्रम फेडरेशनच्या माध्यमातून व सहकार भरतीच्या माध्यमातून घेण्याची विनंती केली. त्याचसोबत सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी सहकारी गृनिर्माण संस्था सुव्यवस्थापक आणि 'तंटा मुक्त संस्था अभियानामध्ये संस्थेच्या समितीने आपल्या वार्षिक सभेत चर्चा करून तंटामुक्त समिती स्थापन करून संस्थेत होणारे वाद–विवाद संस्था कार्यालयात निवारण करणे, त्याच बरोबर या तंटामुक्त अभियानामध्ये सुव्यवस्थापनासाठी एकूण १७ वेगवेगळ्या विषयानुसार कारवाई केल्यास संस्थेतील समिती व सभासद यांच्यात होणारे वाद–विवाद कमी होऊन संस्थेचा व्यवहार पारदर्शक होण्यास शासनाच्या धेय्या धोरणानुसार व सहकारातील ७ तत्वानुसार चालविल्यामुळे सभासदांचा संस्थेचा त्याचबरोबर शासनाचा विकास होण्यास चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

सहकार भारतीचे अध्यक्ष प्रमोद जोशी यांनी सहकार भारती नवी मुंबईमध्ये सहकार क्षेत्रामध्ये विविध उपक्रम राबवत असलेबाद्दलची माहिती देण्यात आली. त्याचसोबत संपूर्ण महाराष्ट्रात सहकार भारती मार्फत अनेक कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दलची माहिती दिली आणि प्रामुख्याने सहकाराचा विकास करणे म्हणजेच संस्कार प्रत्येक कार्यक्रमामध्ये आणून सहकाराबरोबर संस्कार हेही खूपच महत्वाचे असल्याचे उदारणासह सांगून बिना संस्कार नाही सहकार! बिना सहकार नाही उद्धार! याची नोंद उपस्थित सभासदांनी घ्यावी अशी विनंती केली.

नवी मुंबई हौसिंग फेडरेशनचे सचिव भास्कर म्हात्रे यांनी प्रमुख फेडरेशनच्या कार्याची माहिती देण्यात आली. तसेच ॲड. चंद्रकांत निकम यांनी सहकार विभागामध्ये नवीन कायद्यातील तरतुदी १५४ बी तसेच निवडणुका याचसोबत ऑडीटर हा प्रत्येक सहकारी संस्थेत मुख्य भूमिका बजावत असतो याबद्दलची माहिती दिली.

# आवरे येथील शाळेत वक्तृत्व स्पर्धा उत्साहात




**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुक्यातील आवरे येथील जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्रजी माध्यम शाळेत बुधाजी ठाकूर तालुका स्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वक्तृत्व स्पर्धेत उरण तालुक्यातील आवरे, वशेणी, खोपटें पाणदिवे, चिरनेर व वेश्वी आदी इंग्रजी माध्यम शाळांच्या विद्यार्थी, विद्यार्थिनीनी सहभाग घेतला होता. एकूण २९ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

या स्पर्धेमध्ये लहान गटात सान्वी सुमित म्हात्रे, प्रथम श्लोक महेश पाटील द्वितीय तर दिव्यांशू जीवन केणी यांनी तृतीय क्रमांक पटकवला आहे. मधल्या गटात माही विलास कामोठकर प्रथम, जान्वी विश्वास पाटील द्वितीय व श्रेया कुंदन गावंड हिने तिसरा क्रमांक मिळवला आहे. मोठ्या गटात वेदांत रविंद्र गावंड प्रथम, रुद्राज तुकाराम माळी द्वितीय आणि सुहानी सुरेश पाटील ही विद्यार्थिनी तिसऱ्या क्रमांकांची मानकरी ठरली आहे. या सर्व विजेत्या स्पर्धाकांना जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्रजी माध्यम विद्यालयाच्या वतीने रोख रक्कम, ट्रॉफी आणि सॅटिफिकेट देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या स्पर्धाचे उद्‌घाटन शिक्षक पालक संघाच्या उपाध्यक्षा विशाखा गावंड यांच्या हस्ते करण्यात आले. तर या स्पर्धाचे परीक्षक म्हणून साधना पाटील, भावना ठाकूर, अनिल पाटील, सविता गावंड व संजीवनी यांनी केले. या कार्यक्रमासाठी शिक्षक पालक संघाच्या सदस्या कविता म्हात्रे, जागृती म्हात्रे, स्मिता म्हात्रे, सविता म्हात्रे उपस्थित होत्या. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष अशोक ठाकूर शाळेच्या मुख्याध्यापिका कांचन थळी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष मेहेनत घेतली.


# नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयास निळी झळाळी | आंतरराष्ट्रीय बाल दिनाच्या निमित्ताने रोषणाई

**नवी मुंबई : बातमीदार**

२० नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण जगभरात आंतरराष्ट्रीय बाल दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त युनिसेफ या जागतिक पातळीवर कार्यरत नामांकित संस्थेच्या वतीने संपूर्ण जगभरात विविध देशांमध्ये निरनिराळ्या उपक्रमांचे आयोजन केले जाते.

नवी मुंबई महापालिकेची मुख्यालय वास्तू ही भारतातील वास्तूरचनेमध्ये वैशिष्ट्यपूर्ण म्हणून ओळखली जाते. त्यामुळे युनिसेफच्या भारतातील प्रमुखांच्या वतीने आंतरराष्ट्रीय बाल दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या आयकॉनिक मुख्यालय वास्तूला प्रतिकात्मक रितीने निळ्या रंगाची प्रकाशयोजना करावी अशी विनंती करण्यात आली होती.

त्यास अनुसरून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार आंतरराष्ट्रीय बाल दिनाच्या आदल्या व नंतरच्या दिवशी म्हणजेच दिनांक १९, २० व २१ नोव्हेंबर असे तीन दिवस नवी मुंबई महापालिकेची मुख्यालय इमारत निळ्या रंगात उजळून निघते आहे.




आंतरराष्ट्रीय बाल दिनाचे यावर्षीचे उद्दिष्ट 'मुलांचा खेळण्याचा हक्क' हे असून या माध्यमातून मुलांच्या जडणघडणीतील खेळाचे महत्व अधोरेखित करण्यात आलेले आहे. खेळाच्या माध्यमातून मुलांमध्ये नवनवीन गोष्टी शिकण्याची आवड निर्माण होते शिवाय विविध कौशल्यांचा विकास होतो, निर्णयक्षमता वाढते, सांघिक भावना निर्माण होते व या माध्यमातून त्यांचे व्यक्तिमत्व सक्षमीकरण होते हे लक्षात घेऊन यावर्षी खेळाच्या माध्यमातून मुलांचा विकास हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवण्यात आले आहे.

नवी मुंबई महापालिकेने नेहमीच शहरातील मुलांच्या क्रीडा विकासासाठी आवश्यक सुविधा आणि पोषक वातावरण निर्मिती केलेली आहे. खेळाच्या माध्यमातून मुलांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय नजरेसमोर ठेवून दरवर्षीप्रमाणेच यावर्षीही विविध क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नुकत्याच सुरू झालेल्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा महोत्सवामध्ये ४८हून अधिक क्रीडा प्रकारांमध्ये ३०० हून अधिक शाळांमधील ३० हजारहून अधिक मुले स्वतःच्या अंगभूत क्रीडा गुणांचे प्रदर्शन करीत आहेत. त्यामुळे युनिसेफच्या विनंतीनुसार नवी मुंबई महापालिका मुख्यालयास आंतरराष्ट्रीय बाल दिनानिमित्त करण्यात आलेली निळ्या रंगातली झळाळी नवी मुंबईकर मुलांच्या क्रीडा विकासाचे प्रतिक ठरत आहे.

# उरण तालुक्यात निपूण उत्सव



**उरण : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात निपुण भारत अंतर्गत बाल दिनाचे औचित्य साधून १४ नोव्हेंबर २०२२ ते २० नोव्हेंबर २०२२ या सप्ताहात निपुण उत्साह साजरा करण्यात आला.

हा सप्ताह साजरा करण्यासाठी उरण तालुक्यातील शिक्षण विभाग आणि प्रथम शिक्षण संस्थेची संपूर्ण टीम प्रत्येक गावागावातील वाड्या वस्त्यांवर जाऊन १ ते ३ इयत्तेत शिकणाऱ्या मुलांच्या मातांसोबत भेटी देण्यात आल्या. या भेटीदरम्यान पाड्यापाड्यानुसार जे मातांचे गट केले होते त्या गटांना भेटी देऊन आत्तापर्यंत नऊ आयडिया व्हिडिओ कार्डच्या माध्यमातून मुलांचा शारीरिक, भावनिक, बौद्धिक, सामाजिक, भाषा व गणित विकास कशा प्रकारे करण्यात आला याविषयी लीडर माता आणि गटातील माता यांच्यासोबत चर्चा करण्यात आली.

उरण तालुक्यातील माता गटांना भेटून आलेल्या अधिकाऱ्यांनी चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले आणि गावोगावी जाऊन या गटांना प्रोत्साहित केले. यासाठी उरण तालुक्यातील शिक्षण विभागातील गटशिक्षणाधिकारी प्रियांका म्हात्रे त्याचबरोबर केंद्रप्रमुख उर्मिला म्हात्रे, चंद्रकांत म्हात्रे, तुकाराम म्हात्रे, विषय साधनवेक्ती अनिता काटले, ज्योती ठाकूर, मनीषा पाटिल, नीलम गावंड, वैशाली गावंड तसेच प्रथम शिक्षण संस्थेच्या टीम लीडर रणिता ठाकूर, मनीषा गावित, भाषा विषय साधनवेक्ती, शलाखा पिंगळे गणित विषय साधन व्यक्ती, प्रथम प्रतिनिधी प्रेरणा ठाकूर, सुनिता पाटील, सोनाली म्हात्रे, काशीराम निरगुडे, विठ्ठल नांदोकार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक सहभागी झाले होते. सर्वांनी मिळून निपुण माता बनण्यासाठी गटांना प्रोत्साहन दिले.

# खालापुरात सांडपाणी रस्त्यावर

## नगरपंचायत प्रशासनाकडे कारवाईची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

स्वच्छ खालापूर सुंदर खालापूर संकल्पनेला बाहेरील व्यावसायिक हरताळ फासत असून दुर्गंधीयुक्त सांडपाणी थेट मुख्य रस्त्यावर सोडत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

खालापूर नगरपंचायत अस्तित्वात आल्यानंतर स्वच्छतेवर भर देण्यात आला. खालापूर शहर, महड देवस्थान परिसर कायम स्वच्छ असावा यासाठी सुरुवातीला लक्ष पुरविण्यात आले, पण त्यानंतर विपरीत परिस्थिती पहावयास मिळत असून खालापूर शहरातील दर्शनी भाग असलेल्या ठिकाणी सांडपाणी थेट रस्त्यावर सोडण्यात येत आहे.



(छाया : विनायक माडपे)

खालापुर शहरातील तहसील कार्यालयासमोर असलेल्या व्यावसायिक इमारतीमध्ये बाहेरून आलेल्या व्यावसायिकांनी दुकाने थाटली असून यामध्ये डेरी व्यवसाय तसेच हॉटेल, शिव भोजन थाळी चालवणारे व्यावसायिक सांडपाण्याची विल्हेवाट योग्य रीतीने लावत नसून दुर्गंधीयुक्त सांडपाणी थेट रस्त्यावर सोडले जाते. नगरपंचायतीने यापूर्वी वारंवार नोटिसा बजावूनदेखील यात कोणताही फरक पडला नसून नगरसेवकच्या दारातून सांडपाणी सोडण्यापर्यंत व्यावसायिकांची मजल गेली आहे.

खालापूर शहराच्या सौंदर्यात बाधा आणणाऱ्या या व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उभारावा, अशी मागणी नागरिकांधून केली जात आहे.

# नागोठणे ग्रामपंचायतीकडून डम्पिंग ग्राऊंड उभारणीत नियमांना फाटा

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी क्षेपणभूमी म्हणजेच डंम्पिंग ग्राउंड उभारले जात आहे, मात्र ते उभारताना नियमांना फाटा देण्यात आला आहे. यामुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न उद्‌भवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इतकेच नाही तर परिसरातील अनेक गोमाता म्हणजेच गाई डंम्पिंग ग्राउंडवरील कचरा खासकरून प्लास्टिक खात असल्याने संताप व्यक्त होत आहे.

नागोठणे ग्रामपंचायतीचा गोमातेच्या जीवाशी खेळ चालू असल्याची खळबळ घटना शिंदे गटाचे युवा सेना रोहा तालुका सचिव मंदार कोतवाल यांनी उघडकीस आणली आहे.

वरसगावकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूकडे डंम्पिंग ग्राउंडची निर्मिती नागोठणे ग्रामपंचायतीने केली आहे, मात्र डंम्पिंग ग्राउंड निर्माण करीत असताना ज्या अटी–शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे त्यांची पूर्तता प्रथमदर्शनी पाहिल्यावर केलेली दिसत नाही. ग्रामपंचायत उघड्यावरच



(छाया : राज वैशंपायन)

कचरा आणून टाकत आहे. त्यामुळे या जंगल परिसरात, आसपास फिरणाऱ्या गोमाता म्हणजेच गाई त्या कचऱ्यामधील प्लास्टिकचे सेवन करताना आढळत आहेत. प्लास्टिकचे सेवनामुळे गायींचा मृत्यू होतो हे ग्रामपंचायतीला माहीत आहे की नाही, असा सवाल बाळासाहेबांच्या शिवसेनेचे युवासेना रोहा तालुका सचिव मंदार कोतवाल केला आहे. याबाबत ग्रामविकासमंत्री यांना निवेदन देणार असल्याचेही कोतवाल यांनी सांगितले.

दरम्यान, या संदर्भात ग्रामपंचायतीची बाजू समजून घेण्यासाठी ग्रामसेवक मोहन दिवकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा मोबाईल फोन स्वीच ऑफ होता.

# बिरवाडीत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर



(छाया : महादेव सरसंबे)

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्याच्या चणेरा विभागातील मोतीबिंदूग्रस्तांसाठी लायन्स क्लब रोहा, खांबेरे ग्रामपंचायत आणि लायन्स आय फाउंडेशन अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य उपकेंद्र बिरवाडी येथे मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २६ जणांची नेत्रतपासणी आणि १४ मोतीबिंदूग्रस्त रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

या शिबिराच्या आयोजनासाठी लायन्स क्लब ऑफ रोहाचे अध्यक्ष अब्बास रोहावाला, लायन्स आय फाउंडेशन अलिबागच्या डॉ. शुभदा कामथेकर, खांबेरे सरपंच गीता वारगुडे, उपसरपंच जयश्री जोशी तसेच सदस्यांनी सहकार्य केले. शिबिरात नेत्रतज्ञ डॉ. अमोद केळकर, डॉ. सायली केणी, परिचारिका सीमा बेलोसकर, सुजित पाटील यांनी रुग्णांची तपासणी केली. आरोग्य उपकेंद्र मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. गौतम वदक यांनी सर्वांचे स्वागत केले.

# अलिबाग आगाराला साध्या गाडींचा विसर

## शिवशाही गाड्यांमुळे प्रवाशांवर पडतोय वाढीव तिकिटाचा भार

**मुरूड : प्रतिनिधी**

अलिबाग आगारातून अलिबाग–पनवेल या गाड्या विनावाहक प्रवास अगदी थेट सेवा दिली जाते. गेल्या काही महिन्यांपासून अलिबाग आगार प्रमुख नफा जास्त कमावण्यासाठी अलिबाग–पनवेल सेवा देत असताना शिवशाही गाडीचा सर्रास वापर करीत आहेत. त्यामुळे प्रवासीवर्गाचे मात्र जास्त पैसे खर्च होत आहेत.

अलिबाग–पनवेल शिवशाही बसने प्रवास केल्यास याचे तिकीट १३० रुपये आकारले जाते, तर याच मार्गावर साधी लाल गाडी वापरल्यास ९० रुपये तिकीट असते, पण पनवेल मार्गावर विनावाहक प्रवासाठी बेधडक शिवशाही बस वापरल्याने प्रत्येक प्रवाशाला ४० रुपये जास्त भरावे लागत आहेत. त्यामुळे प्रवासीवर्गाकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे

प्रवासीवर्गाची मागणी नसतानासुद्धा सर्रास शिवशाही बसचा वापर केला जात आहे. शिवशाही बसशिवाय इतर कोणतीही बस या मार्गावर न पाठवली जात असल्याने नाइलाजास्तव प्रवाशांना याच बसने प्रवास करावा लागत आहे, पण सामान्य प्रवाशांना त्यामुळे भूर्दंड पडत आहे

याबाबत प्रवासी संघटनेनेसुद्धा नाराजी व्यक्त केली आहे. अलिबाग आगराने साधी लाल गाडी विनावाहक सुधा सुरू करावी, अशी समस्त प्रवासीवर्गाकडून मागणी होत आहे. लाल गाड्या उपलब्ध असताना केवळ नफा कमावण्यासाठी शिवशाही गाड्या सुरू करणे हे कितपत योग्य आहे, असा सवाल प्रवाशांमधून केला जात आहे.



(छाया : संजय करडे)

# साजगाव यात्रेमध्ये नाग

## सर्पमित्राकडून मिठाईच्या दुकानातून रेस्क्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात कोरोना महामारीनंतर यंदा बोंबल्या विठोबा यात्रेचे जल्लोषात आयोजन केले गेले आहे. यात्रेतील शैलेश आंबवणे यांच्या मिठाईच्या दुकानात शुक्रवारी रात्री नाग दिसला. सर्पमित्र अमोल ठकेकर यांनी या सापाला सुरक्षित ताब्यात घेतले.

साजगाव यात्रेसाठी तात्पुरत्या काळाकरिता वन खात्याच्या जमिनीवर झाडी, गवत साफ करून दुकान थाटले जाते. या यात्रेत शैलेश आंबवणे यांचेही मिठाईचे दुकान आहे. शुक्रवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास त्यांच्या दुकानातील आतल्या भागात दगड गोट्याची भर घालून बनवलेल्या जमिनीवर कामगाराला साप दिसला. त्याने लागलीच ही बाब आंबवणे यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर सर्पमित्र अमोल ठकेकर यांना या ठिकाणी पाचारण करण्यात आले. ठकेकर यांना तेथे नाग जातीचा साप दिसून आला. विशाल चव्हाण यांच्या मदतीने त्यांनी या नागाला सुरक्षितपणे ताब्यात घेतले.

एकीकडे यात्रेत भाविकांची तुडुंब गर्दी आणि दुसरीकडे दुकानातील अडगळीची जागा असताना अमोल ठकेकर यांनी अत्यंत काळजीपूर्वकपणे नागाला पकडले. हा नाग जातीचा साप पूर्ण वाढ झालेला व साधारणतः पाच फूट लांबीचा होता.





**मुरूड : सध्या मासळी चांगली मिळत असून समुद्रकिनारी बोटींची रेलचेल पहावयास मिळत आहे. मासळी मुबलक मिळत असल्याने मासे खाण्यासाठी बगळेही होड्यांची आतुरतेने वाट पाहत असतात. त्यामुळे किनाऱ्यावर बगळे मोठ्या संख्येने पहावयास मिळत आहेत.** (छाया : संजय करडे)

# वैद्यकीय व आरोग्य क्षेत्राला समर्पित कार्यकर्ता

भाजपच्या वैद्यकीय आघाडीचे महाराष्ट्राचे प्रमुख डॉक्टर अजित गोपछडे पक्षाचा आदेश शिरसावंद्य मानून कार्यरत असतात. कोरोना या जागतिक महामारीच्या काळात वैद्यकीय क्षेत्राची जबाबदारी असल्याने त्यांनी मुंबईतील धारावी व उपनगरातील जनकल्याण समिती, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजप वैद्यकीय आघाडीचे सेवाकार्यामध्ये स्वतःला झोकून दिले होते. आजही ते कार्यरत असतात. त्यांचे समर्पित कार्य कौतुकास्पद आहे.

कोरोना भारतातही दोन वर्षे थैमान घालत होता. त्या काळात भाजप वैद्यकीय आघाडीच्या माध्यमातून वॉर्ड आणि गावपातळीवरील वैद्यकीय क्षेत्रातील कार्यकर्ते व सेवाकर्मी टीम उभी करून जनसामान्यांपर्यंत रुग्णसेवा सुलभतेने कशी पोहचवता येईल या दृष्टिकोनातून विविध पॅथींचे डॉक्टर्स, दंतशल्यचिकित्सक, पॅरामेडिकस, फार्मासिस्ट, नर्सेस, आरोग्यसेवक यांना एका छत्राखाली आणून प्रत्येक गावागावामध्ये छोटे छोटे समूह निर्माण करण्यात आले. सेवाकार्याच्या रूपाने त्यांना एका सूत्रामध्ये बांधण्याचे काम डॉ. अजित गोपछडे यांनी केले. ऑनलाईन बैठका, व्यक्तिगत भेटीगाठी, महाराष्ट्रातील प्रवास अत्यंत जोखमीच्या काळामध्ये उतरून एक प्रवासी संगठन राज्यभर उभे केले.

ऑनलाईन बैठका, हेल्पलाईन, कम्युनिटी किचन, फिरते रुग्णालय, घरोघरी तपासण्या, औषधांचे वाटप, समुपदेशन, रुग्णालयामध्ये ऑक्सिजन व इंजेक्शनचा पुरवठा, पीपीई किट, फेसमास्क आणि हॅण्ड सॅनिटायझर वाटप अशा अनेक कामांचा वेध, वेगवेगळे विभाग करून ऑनलाईन बैठकांद्वारे सूचित करून कामाचा आढावा घेतला जाई व दुसऱ्या दिवशी कामाचे वाटप ठरवले जाई. अशा पद्धतीने कामाची यथेच्छ मांडणी करून जे सेवकर्मी कोरोना पॉझिटिव्ह झाले असतील त्यांना सेवेतून आराम देऊन लगेच दुसरा चमू कामाला लागे. अशा पद्धतीने नियोजन करून संकटकाळात एक प्रचंड कार्य उभे होतानाचे साक्षीदार आम्ही आहोत. अहोरात्र वेगवेगळ्या ऑनलाईन बैठकांद्वारे देशाचे आरोग्यमंत्री, केंद्रीय आयुष्य मंत्रालय, विरोधी पक्षनेते केंद्रीय मंत्री, राज्यातील डॉक्टर्स असलेले खासदार, सोबत या आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या खासदारांसोबत तसेच विधान परिषदेतील पक्षनेते, आयसीएमआरचे केंद्रातील सर्व अधिकारी या महाराष्ट्रातील संघटनेस अहोरात्र मार्गदर्शन करीत होते. या सर्व



टीमला वैद्यकीय आघाडीचे मार्गदर्शक यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभत होते. कुठल्याही राजकीय अभिनिवेश न ठेवता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे होलिस्टिक इंडियाचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने टाकलेले हे देशातील वैद्यकीय व आरोग्य क्षेत्रातील महाराष्ट्र राज्यात टाकलेले पहिले पाऊल आहे.

मुंबईतील धारावी विषयापासून दाटीवाटीच्या लोकवस्त्यांमध्ये घाटकोपरपासून मानखुर्द, गोवंडी, वसई, विरार सर्व झोपडपट्ट्यांपासून ते ठाण्यापर्यंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने हे सर्व कार्य तन्मयतेने व समर्पित भावनेतून चालू होते. विशेषतः मास स्क्रिनिंग, फेव्हर क्लीनिक, रक्त तपासणी, क्रिटिकल केअर मॅनेजमेंट, रुग्णालयांमध्ये रुग्णांना बेड उपलब्ध करून देणे, ऑक्सिजन व्हेंटिलेटर, इंजेक्शन्स उपलब्ध करून देणे या संदर्भात कॉर्पोरेट रुग्णालयासोबत संपर्क करून विशेषतः शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये रुग्णसेवकांच्या समन्वयामधून जीवदानाला अहोरात्र यज्ञ चालू होता. हे सर्व करीत असताना टाटा समूहाचे उद्योगपती यांनी सर्व वैद्यकीय प्रकोष्ठ टीमला निवासाची व भोजनाची मुंबईमध्ये तीन–चार महिने सोय उपलब्ध करून दिली होती. हे करीत असताना अनेक डॉक्टर्स आजारी पडले, काही व्हेंटिलेटर्सवर जाऊन परत आले.

कोविड लसीकरण व प्रबोधन कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रात पंतप्रधानांच्या मार्गदर्शनाखाली कुठलाही गाजावाजा ना करता कुठल्याही टीव्ही चॅनेल व मीडियामध्ये न जाता प्रत्येक जिल्ह्यात ही टीम लसीकरणाच्या यशस्वितेकरिता काम करीत होती. यादरम्यान पेशंट्स व गरीब जनतेपर्यंत जाऊन चप्पल्स, ब्लँकेट्स, कम्युनिटी किचन, फिव्हर क्लिनिक इत्यादी सर्व गोष्टी निरंतर चालू होत्या. ग्रामीण भागात विशेषतः आरोग्य प्रशासनास लसीकरणाच्या कार्यात या टीमने अत्यंत मोलाचे सहकार्य केले आहे. काही डॉक्टर अगदी सेवा पुरवताना मृत्यूशय्येपर्यंतदेखील जाऊन आले आहेत.

उभारलेले संघटन चिरस्थायी राहावे यासाठी केंद्रीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली राज्य व देशात अशा प्रकारचे वैद्यकीय संघटन गठीत करून स्वास्थ्याविषयक उद्रेक निर्माण झाल्यास हे संगठन आपत्कालीन व्यवस्थेसोबत खांद्याला खांदा लावून काम करेन आणि याच संकल्पनेला सत्यात उतरवून राज्यातील भाजप वैद्यकीय आघाडीचे स्वस्थ स्वयंसेवक अभियानाचे प्रमुख म्हणून डॉ. अजित गोपछडे यांना केले. विविध तज्ञ डॉक्टरांचा मजबूत नेटवर्क तयार करून जनमानसापर्यंत सेवा व नियोजन तयार करणारे नेतृत्व डॉ. गोपछडे व त्यांचे वैद्यकीय संघटन महाराष्ट्र शासनाला नेहमीच सहकार्य, सेवा आणि उपाय योजना देत सर्व जातीधर्माच्या पलीकडे जाऊन समाजाबद्दल आदर ठेवत कर्तव्यदक्ष असतात.

राजकारण व समाजकारणात कुठलाही पक्ष असो व विचारधारा त्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी समर्पण, सेवावृत्ती, संयम, समाज व देशाप्रतीची असलेली भक्ती सदैव जागृत ठेवली तर अशा प्रकारच्या सामाजिक, राजकीय व आरोग्यविषयक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन होण्यासाठी हे एक प्रकारचे सुदृढ पाऊल म्हणावेच लागेल. अशा उदाहरणांच्या माध्यमातून देशात काम करणाऱ्या विविध चळवळीतील युवकांना आपापले करिअर घडविताना अशा प्रकारच्या उदाहरणातील दृष्टिकोन समोर ठेवून भविष्यातील कामाची दिशा सुनिश्चित करता येते.

**–डॉ. राहुल कुलकर्णी**

# भारताचा न्यूझीलंडवर मोठा विजय

## टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी

**माउंट मांउगानुई : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना रविवारी (दि. २०) माउंट मांउगानुई येथे खेळला गेला. या सामन्यात सूर्यकुमार यादवने केलेल्या शतकी खेळाच्या जोरावर न्यूझीलंडसमोर १९२ धावांचे लक्ष्य ठेवले, मात्र हे लक्ष्य गाठण्यात न्यूझीलंडच्या नाकीनऊ आले आणि भारताचा न्यूझीलंडवर ६५ धावांनी विजय झाला. भारताने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.



मालिकेतील पहिला सामना पावसाने वाहून गेला होता. रविवारी झालेल्या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताची सुरुवात काही खास नव्हती. भारताची पहिली विकेट ३६ धावांवर पडली, जेव्हा ऋषभ पंत १३ चेंडूत सहा धावा करून बाद झाला. यानंतर ईशान किशनने वेगवान धावा करीत भारताची धावसंख्या ५०च्या पुढे नेली, पण तोही ३६ धावा करून बाद झाला. पावसामुळे २७ मिनिटांचा खेळ वाया गेला, मात्र षटकांच्या संख्येत कोणतीही घट झाली नाही.

सूर्यकुमार यादवने जबाबदारी स्वीकारली आणि वेगवान धावा केल्या, पण दुसऱ्या टोकाला विकेट पडत राहिल्या. श्रेयस अय्यरला नऊ चेंडूत १३ धावा केल्यावर विकेट पडली. भारताचा कर्णधार हार्दिक पांड्या १३ चेंडूत १३ धावा करून बाद झाला. त्यानंतर आलेल्या दीपक हुडा आणि वॉशिंग्टन सुंदर यांना खातेही उघडता आले नाही. अखेरीस, सूर्यकुमार यादवने ५१ चेंडूत १११ धावांची वादळी खेळी केली. तो शेवटपर्यंत नाबाद राहिला. त्याने आपल्या खेळीत ११ चौकार आणि सात षटकार मारले. त्याच्या शतकी खेळीमुळे भारताने १९१ धावा केल्या.

१९२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात अतिशय खराब झाली. विस्फोटक फिन ॲलन खाते न उघडताच बाद झाला. सामन्याच्या दुसऱ्या चेंडूवर भुवनेश्वर कुमारने त्याला अर्शदीप सिंगकडे झेलबाद केले. ५६ धावांच्या स्कोअरवर न्यूझीलंडची दुसरी विकेट पडली. वॉशिंग्टन सुंदरने डेव्हन कॉनवेला बाद करून भारताला दुसरे यश मिळवून दिले. युझवेंद्र चहलने ग्लेन फिलिप्सला बाद करून भारताला तिसरे यश मिळवून दिले. दीपक हुड्डाने डॅरिल मिशेलला झेलबाद केले. युझवेंद्र चहलने डावाच्या १४व्या षटकात जेम्स नीशमला बाद केले आणि किवी संघाचा निम्मा संघ बाद झाला. १६व्या षटकातील पाचव्या चेंडूवर न्यूझीलंडला पाचवा धक्का बसला आहे. मोहम्मद सिराजने मिचेल सँटनरला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. त्यानंतर न्यूझीलंडचा डाव १२६ धावात संपुष्टात आणला. न्यूझीलंडकडून कर्णधार केन विलियम्सनने सर्वाधिक ६१ धावा केल्या.

### कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा

# महाराष्ट्र उपांत्यपूर्व फेरीत



**हरिद्वार : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या मुलांनी ४८व्या कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्यपूर्व फेरीत त्यांचा सामना बलाढ्य हरियाणा संघाशी होईल.

उत्तराखंड राज्य कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने ऋषिकेश, हरिद्वार येथील पंतदीप क्रीडांगणावर सुरू असलेल्या उपउपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात महाराष्ट्राने कर्नाटकला ५५-२५ अशी धूळ चारत आगेकूच केली. प्रथम सत्रात प्रतिस्पर्धी संघाचा अंदाज घेत खेळ करणाऱ्या महाराष्ट्राने २३-१३ अशी आश्वासक आघाडी घेतली होती. दुसऱ्या सत्रात खेळ थोडा गतिमान करीत ३० गुणांच्या मोठ्या फरकाने आपला विजय साकारला. महाराष्ट्राच्या या विजयात संघनायक दादासो पुजारी याने सात, वैभव वाघमोडेने पाच, तर वैभव कांबळेने चार यशस्वी पकडी करीत या विजयात मोलाची भूमिका वटविली. त्याचबरोबर शिवम पठारे याने चढाईत आठ, प्रतीक जाधवने सहा, रजतकुमार सिंगने पाच गुण मिळवित त्यांना उत्तम साथ दिली. पूर्ण स्पर्धेत महाराष्ट्राचा बचाव भक्कम झाला आहे.

या अगोदर झालेल्या शेवटच्या साखळी सामन्यात महाराष्ट्राने राजस्थानचा सरळ पराभव करीत ग गटात अपराजित रहात बाद फेरी गाठली होती.

## रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या रक्षाला सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नाशिक येथे नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य उपज्युनियर बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स अंतर्गत योगेश पाटील बॅडमिंटन अकादमीच्या रक्षा कंदासामी हिने सुवर्णपदक पटकाविले आहे.



नाशिक येथे उपज्युनियर बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा झाली. या स्पर्धेत रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स अंतर्गत योगेश पाटील बॅडमिंटन अकादमीच्या रक्षा कंदासामीने अंतिम फेरीत श्रावणी वाळेकरला १७-२१, २१-१८, २१-१९ असे नमवून सुवर्णपदक जिंकले. तिला प्रशिक्षक योगेश पाटील, मलेशियाचे प्रशिक्षक हैरी व प्रशिक्षक राजेंद्र घरत यांचे मार्गदर्शन लाभले.

## ज्युडो स्पर्धेत 'सीकेटी'तील विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांतर्गत नुकत्याच झालेल्या पनवेल महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय ज्युडो स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली.

यामध्ये सादिका मंसुरी प्रथम क्रमांक, विघ्नेश सारंग प्रथम क्रमांक, रोहित यादव प्रथम क्रमांक, आर्यन स्वेन प्रथम क्रमांक, अतुल पासवान प्रथम क्रमांक पटकावला. सर्व विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय शालेय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

यशस्वी क्रीडा स्पर्धकांचे संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, पर्यवेक्षक अजित सोनवणे, प्रशांत मोरे, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, माधवी कोळी, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




## कर्जतमध्ये आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धा

**कर्जत : प्रतिनिधी**

फार्मसी डिप्लोमा आणि तंत्रनिकेतन महाविद्यालयांच्या विभागीय खो खो स्पर्धेचा कर्जतमधील कोकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयाच्या मैदानात समारंभपूर्वक शुभारंभ करण्यात आला.


(छाया : विजय मांडे)

स्पर्धेचे उद्घाटन कोकण ज्ञानपीठ संस्थेचे विश्वस्त झुलकरनैन डाभिया यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. या वेळी खो खोच्या राष्ट्रीय खेळाडू मुक्ता झरेकर, पंच नवनाथ दाभाडे, अंकित सोनी, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, ज्ञानेश्वर जाधव, दीपक बोराडे, डॉ. भरत टेकाडे, डॉ. अमोल चांदेकर, प्रा. अनिकेत इंदुलकर, प्रा. दिशा भिलावे, रेवती देशपांडे, हर्षल मंडावळे, अनुष्का जगताप आदींसह प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या डिप्लोमा विभाग प्रमुख प्रा. मनीषा चौधरी आणि प्रा. हेमंत ढेकणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. नवनाथ दाभाडे यांनी स्पर्धेचे नियम सांगितले आणि शिस्तबद्ध स्पर्धा होण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले. विजय मांडे यांनी, स्पर्धांमध्ये हार-जीत असते. कुणी तरी एकच संघ अजिंक्य होईल. त्यामुळे खेळताना खिलाडूवृत्ती दाखवावी तसेच संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक यांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

# आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंचा दबदबा

**उरण, पेण : वार्ताहर, प्रतिनिधी**

नेपाळ येथे शनिवारी झालेल्या संयुक्त भारत खेल फाउंडेशनच्या सातव्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये उरणसह रायगड जिल्ह्यातील सात जलतरणपटूंनी विविध प्रकारांत १३ सुवर्ण व एक रजत पदक पटकावत सुवर्ण पताका झलकावली आहे. देशाचे प्रतिनिधित्व करीत अत्यंत चुरशीच्या झालेल्या स्पर्धेमध्ये या सातही स्पर्धकांनी आपला ठसा उमटवत जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावले आहे.






संयुक्त भारत खेल फाउंडेशन यांच्या वातीने इंदौर, मध्यप्रदेश येथे घेण्यात आलेल्या सातव्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये आर्यन विरेश मोडखरकर, हितेश भोईर आणि जयदीप सिंग या तीन स्पर्धकांनी प्रत्येकी तीन सुवर्णपदकांची कमाई केली होती, तर तिघांनी या वेळी एकूण नऊ सुवर्ण पदके मिळविली होती. या स्पर्धेनंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी या तीनही जलतरणपटुंची निवड झाली होती. शनिवारी येथे झालेल्या संयुक्त भारत खेल फाउंडेशच्या सातव्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये जलतरण विभागातील स्पर्धेमध्ये आर्यन विरेश मोडखरकर याने वर्ष वयोगटामधील ५० मी. बटरफ्लाय आणि १०० मी. फ्रिस्टाईल या प्रकारात स्पर्धा करीत दोनही स्पर्धांमध्ये सुवर्ण पदकांची कमाई केली आहे, तर हितेश भोईर याने ३० वयोगटामधील ५० मी. फ्रिस्टाईल आणि २०० मी. आयएम या प्रकारामध्ये सुवर्ण पदकांची कमाई केली आहे. जयदीप सिंग यानेही ५० मी. ब्रेस्ट स्ट्रोक आणि १०० मी. ब्रेस्टस्ट्रोक या प्रकारामधील सुवर्ण पदकांवर आपले नाव कोरले आहे, तर सचिन उल्हास शिंगरुत दोन सुवर्ण पदके, संकेत म्हात्रे दोन सुवर्ण पदके, समर्थ नाईक एक सुवर्ण एक रजत, तर सनी टाक याने दोन सुवर्ण पदके मिळवून देशासाठी १३ सुवर्ण व एक रजत पदकाची कमाई केली आहे.

आंतरराष्ट्रीय स्तवरील या स्पर्धांमध्ये सहभागी होत, रायगड जिल्ह्यातील या सात खेळाडूंचे अभिनंदन केले जात आहे.




## मद्यबंदीच्या निर्णयामुळे 'फिफा'चे ६१२ कोटींचे नुकसान

**कतार : वृत्तसंस्था**

जागतिक फुटबॉल स्पर्धेला कतारमध्ये सुरुवात झाली आहे. फुटबॉल लढतीदरम्यान स्टेडियममध्ये मद्यविक्रीवर बंदी लावण्यात आली आहे. यामुळे आता फिफाचा बीअर कंपनीसोबतचा करार अडचणीत येण्याची दाट शक्यता आहे, तसेच यामुळे या करारामुळे मिळणाऱ्या ६१२ कोटी रुपयांवरही त्यांना पाणी सोडावे लागू शकते.

आखाती देशात सार्वजनिक ठिकाणी दारू पिणे बेकायदेशीर आहे. मद्यावर कडक नियंत्रण असलेला कतार हा देश फुटबॉल महोत्सवासाठी त्यांचे कायदे शिथिल करेल, पण प्रत्यक्षात असे झाले नाही. यजमान देश कतार येथील अधिकारी आणि फिफा यांच्यातील चर्चेनंतर स्टेडियम्समध्ये बिअर विकता येणार नाही असे ठरवण्यात आले आहे. फिफा फॅन फेस्टिव्हल, इतर चाहत्यांची ठिकाणे आणि परवानाकृत स्थळ येथे मद्यपेयांच्या विक्रीवर लक्ष केंद्रीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**पनवेल : क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड अंतर्गत झालेल्या पनवेल महापालिका जिल्हास्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेत चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या क्रिकेट संघाने विजेतेपद पटकाविले. या संघाची मुंबई विभागीय शालेय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**



## हिरकणी प्रतिष्ठानच्या सायकल स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**डोंबिवली : प्रतिनिधी**

महिलांचे आरोग्य, महिला विचारासाठी एक स्वतंत्र व्यासपीठ म्हणून डोंबिवलीतील काही महिलांनी एकत्र येऊन हिरकणी प्रतिष्ठान संस्थेची गेल्या वर्षी स्थापना केली. या संस्थेच्या स्थापनेला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हिरकणी प्रतिष्ठानतर्फे रविवारी (दि. २०) सकाळी ठाकुर्लीतील रस्त्यावर सायकल स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेत ६४ वर्षांच्या सुषमा आपटे या वृद्ध महिलेच्या स्पर्धेतील सहभाग सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होता. ३० ते ४० वयोगटात परिणिता गोसावी प्रथम, किरण कानसे द्वितीय, तेजस्विनी शेलटे तृतीय क्रमांक पटकाविला.

४१ ते ५० वयोगटात नीता सोनवानी प्रथम, शुभांगी मगर द्वितीय, विभावरी इखे तृतीय, ५१ ते ६० गटात माधुरी कारंडे प्रथम, ऋती अग्निहोत्री द्वितीय, मंजुषा गोरे तृतीय यांना देण्यात आला. ६४ वर्षांच्या सुषमा आपटे यांना उत्तजेनार्थ बक्षिस जाहीर करण्यात आले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com